म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. बा.
दा. क्र. १०७

सारांच चमत्कार

BVBK-0400107

१०८

# निवेदन

मी 'आनंदा'त १९२८ साली आलो त्यावेळी कै. गु. वा. गो. आपटे हे बंगाली पुस्तके व मासिके माझ्याकडून वाचून घेत. एका बंगाली मासिकात एक अद्भूत कथा मी वाचली. अंतराळातील काल्पनिक सहलीचे ते वर्णन होते. मला ते फारच आवडले. आणि तो आधार घेऊन मी 'साराच चमत्कार!' ही बाल कादंबरिका लिहिली.

त्या गोष्टीला आता ४० वर्षे झाली आहेत. आता मानव खरोखरच अंतराळात हजारो मैल ओलांडून चंद्रावर उतरत आहे. अंतराळयुगाचा अरुणोदय होत आहे. अशा वेळी एका मित्रमंडळाने मंगळावर स्वारी कशी केली याचे हे कल्पना चित्र मुलांना विशेष चित्ताकर्षक वाटेल असे वाटते.

ही कथा मी आकाशवाणीवर बाल विभागाचा संयोजक असताना क्रमश: सांगितली. मुलांना ती फारच आवडली. आपण स्वप्नात मंगळावर गेलो, मंगळावरील माणसे आपल्या डोळ्यापुढे जागेपणीसुद्धा उभी राहतात, अंतराळात केव्हा जायला मिळेल असे झाले आहे. अशा अगणित मुलांच्या प्रतिक्रिया होत्या. साहसाची प्रवृत्ती वाढविण्यास आणि वैज्ञानिक दृष्टी वाढण्यास अशा प्रकारचे साहित्य विपुल प्रमाणात निर्माण झाले पाहिजे.

प्रत्यक्ष निवेदन आणि मूक वाचन दोन्ही प्रकारांचा समन्वय करून ही आवृत्ती तयार केली आहे. म्हणजे एक प्रकारे हे स्वतंत्र असे नवेच पुस्तक आहे. बालवाचकांना ते आवडेल ही खात्री वाटते.

रामकृष्ण
नातूबाग
पुणे ३०

गोपीनाथ तळवलकर

BVBK-0400107

# प्रकाशकीय

किशोरांसाठी विविध मनोरंजक व उद्‌बोधक पुस्तके प्रकाशित करण्याचा संकल्प आहे. आजपर्यंतची आमची पुस्तके किशोर मित्रांना फारच आवडली. संस्कारक्षम बालमनावर मनोरंजनाद्वारे संस्कार म्हणजेच उत्तम पुस्तके. "विनोदविकास माला" संचातील पुस्तके प्रख्यात बालवाङ्‌मय लेखकांनी लिहिलेली आहेत. संचाचे संयोजन माननीय गोपीनाथ तळवलकर यांनी करून या संचाचे निर्मितीस बहुमोल सहाय्य केले आहे. अशा या उत्तम संचाचे स्वागत आमचे बालमित्र निश्चितच करतील. उत्तमोत्तम पुस्तके म्हणजेच

''अरगडे कुलकर्णी प्रकाशने''

# एक

सकाळची वेळ. उन्हे घरांमध्ये आली होती. समोरच्या फांदीवर एक बुलबुल पक्षी इकडून तिकडे नाचत होता. अभिराम रेडिओचे बटन फिरवून मराठी बातम्या ऐकू लागला. त्याने चहा नुकताच संपविला होता आणि ताज्या वर्तमानपत्रावर तो नजर टाकीत होता. इतक्यात कोपऱ्यात असलेल्या टेलिफोनची घंटा खणखणली. "हॅलो, मी अभिराम बोलतोय ...! हं कोण आहे? नमस्ते, आज सकाळीच आठवण झाली. काय, एखादा नवा तारा सापडलाय? की धूमकेतू दिसू लागलाय्.... काय म्हणता? त्यापेक्षाही चमत्कारिक बातमी! भयंकर नव्हे.... मग? आश्चर्यकारक...काय, फोनवरून नाही सांगता येणार? येऊ म्हणता? बरं, एक तासाच्या आत येतो."

अभिराम आपल्याशीच हसला. फोन सदाशिवरावचा होता. सदाशिवराव त्याचे जेष्ठ मित्र. ते चांगले ४५ वर्षांचे होते. अभिराम वीस वर्षांचा तरुण बी. एस्. सी. च्या शेवटच्या परीक्षेला बसणार होता. पण दोघांच्या वयातील अंतर त्यांच्या मैत्रीच्या आड येऊ शकले नाही. सदाशिवराव म्हणजे अतिशय निगर्वी

आणि सरळ मनुष्य. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांशी ते मन-मोकळेपणाने वागायचे.

मुंबईत त्यांना अनेक मित्र होते. पण अभिरामवर त्यांचा विशेष जीव असे. एकतर अभिराम आज्ञाधारक, हुषार आणि सुसंस्कृत होता. सदाशिवराव हे अगदी वेगळ्या तऱ्हेचे गृहस्थ होते. ते कुणाच्या कुचेष्टेत कधी वेळ घालवित नसत. आपली पुस्तके बरी की आपण बरे असे त्यांचे वागणे असे. त्यांना खगोल-शास्त्राचा नाद होता. अंतराळासंबंधी त्यांचे संशोधन सुरू असे. त्या संबंधीची अनेक यंत्रे त्यांच्याजवळ असत. वाचन, लेखन, निरीक्षण यात त्यांचा दिवस जाई. साध्या माणसांना ते छांदिष्ट वाटत. कुणी त्यांना वेडपट समजत! पण अभिरामला मात्र या थोर माणसाची योग्यता कळली होती. त्यांचा प्रत्येक शब्द तो लक्ष लावून ऐके. मधूनच खुबीदार प्रश्न करी. त्याच्यासारखा जिज्ञासू श्रोता मिळाल्याने सदाशिवराव फार खूष असत. कुठे काही नवीन माहिती मिळाली की ती सदाशिवराव अभिरामला सांगत. आजही असेच कारण झाले होते. म्हणून त्यांनी अभिरामला बोलाविले होते.

अभिराम म्हणल्याप्रमाणे तासाच्या आत सदाशिवरावांच्या-कडे पोहचला. आपल्या खोलीत सदाशिवराव इकडून तिकडे खेपा घालीत होते. ते वर्णाने गोरे असून त्यांची अंगकाठी मजबूत होती. डोक्याचे केस किंचित् मागे हटले होते आणि कानशिलावर थोडी पांढरी छटा दिसू लागली होती. अभिराम आलेला पाहून त्यांच्या विचारमग्न चेहऱ्यावर हास्य उमटले. ते अभिरामला म्हणाले, "आलास बाबा, म्हटलं येतोयस की नाही? का कुठे कामात गुंतलास?"

" इतक्या तातडीने बोलावलंत ? आश्चर्य तरी कोणतं आहे ? कळू द्या."

सदाशिवरावांनी एक वर्तमानपत्र पुढे केलें. ते म्हणाले, "हे वर्तमानपत्र घे. पहा यात काय लिहिलं आहे. मी निळ्या पेन्सिलीनं त्या मजकुरावर खूण केली आहे." अभिराम वाचू लागला.



## " अपूर्व चमत्कार ! "

### "ही करणी माणसाची का पिशाच्याची ?"

मुंबईपासून सुमारे पन्नास मैल अंतरावरच्या विश्रामगावी सध्या अद्भूत चमत्कार घडून येत आहेत. पोलीस तपास चालू आहे. परंतु हे चमत्कार कोण करतो याचा पत्ता अजून लागत नाही. एक महिन्यापूर्वी विश्रामगावाजवळील रत्नावती नदीतून

एक होडी चालली होती. तिच्यातील नावाड्यांचा पत्ता नाही! पोलिसांनी कसून तपास केला. पण व्यर्थ! दुसरा एक चमत्कार तर याहूनही आश्चर्यजनक आहे. गावाबाहेर एक देवीचे देऊळ आहे. त्याच्या शेजारी एक भला मोठा वटवृक्ष होता. हा वृक्ष १५० वर्षांहून अधिक जुना असावा असे लोक सांगतात. मागील शुक्रवारी सकाळी हा वटवृक्ष जागेवर नाही असे दिसून आले! वृक्षावर काही वानर होते. तेही अदृश्य झाले. हा वृक्ष राक्षसासारख्या कोणी बलवान् प्राण्याने उपटून नेला असावा असे दिसते. तिसरा चमत्कार म्हणजे विश्रामगाव स्टेशनातून एक एंजिन हरवले. एंजिनात विस्तव नव्हता आणि ड्रायव्हर गावात आला होता. मग हे कसे झाले? ह्या सर्व गोष्टींच्या मुळाशी कोण आहे, हे कळत नाही. कोणा बदमाषाच्या किंवा लुटारूंच्या टोळीचे हे काम नाही. कारण तसे असते तर होडीचा व एंजिनाचा पत्ता खास लागला असता. येवढा प्रचंड वटवृक्ष उपटून नेणे हे मानवी शक्तीच्या बाहेरचे काम आहे हे सांगणे नकोच. आणि हे चमत्कार इतक्या त्वरेने आणि कानाचे कोपऱ्यासही कळू न देता घडून आले हे केवढे आश्चर्य म्हणावयाचे? विश्राम गावातील लोक यामुळे भयभीत झाले आहेत. चमत्कार घडतो तेव्हा भयंकर शब्द उठतो व चोहोबाजूंनी बर्फासारखा अंगाला झोंबणारा थंड गार वारा सो सो करीत जोराने वाहत असतो. या शब्दाचा आणि थंड वाऱ्याचा कार्यकारणसंबंध काय असेल न कळे. बातमीदाराने ही सर्व हकिकत प्रत्यक्ष पाहून लिहिलेली आहे. आजपर्यंत पुष्कळ चमत्कार आमच्या ऐकण्यात आले आहेत. पण असा चमत्कार कधी ऐकला नव्हता. वरील बातमी अक्षरशः खरी आहे. याविषयी आम्हाला तिळमात्र शंका नाही. आमच्यावर ज्यांचा विश्वास नसेल त्यांनी

स्वतः विश्राम गावाला जाऊन खात्री पटवून घ्यावी एवढेच आम्ही सांगतो."

* *

# दोन

अभिराम काही काळ स्तब्ध बसला. सदाशिवराव म्हणाले,

"सगळं नीट वाचलंस ?"

"हो वाचलं."

"काय वाटतं तुला ह्या चमत्काराबद्दल ?"

"सगळी भूतचेष्टा आहे असं म्हणावं लागेल."

"भूतचेष्टा ? अभिराम तुझ्यासारख्या सुशिक्षित तरुणांचा भूताखेतावर विश्वास तरी कसा बसतो ? मी पुष्कळ भूतचेष्टा ऐकल्या आहेत पण एखादा प्रचंड वड किंवा सबंध एंजिन गडप करणारं भूत कधी ऐकलं नव्हतं. खरं म्हणजे मी भूतबीत मानीत नाही."

"मग ह्या सर्व चेष्टांच्या मुळाशी कोण असावा असं तुम्हाला वाटतं ? कुणा माणसाचं तर हे कृत्य नसेल ?"

"छे रे ! एवढ्या मोठाल्या वस्तू चोरून नेऊन कायमच्या गडप कुणाला करता येतात का ? बरं, सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसारखा आवाज माणूस कसा काय निर्माण करू शकेल?"

ह्यावर अभिराम म्हणाला, "भूत नाही, माणूस नाही मग हा चमत्कार करतं तरी कोण ?" यावर सदाशिवरावांनी उत्तर दिलं, "ह्या मागे एखादी अलौकिक अज्ञात शक्ती असली पाहिजे. ह्या चमत्कारानुळं मला फार आनंद झाला आहे. एक नवं विश्व आपल्यापुढं उलगडत आहे असं आपणाला वाटतं. आपला आता अंतराळाशी संबंध येणार आहे. पृथ्वीला नवीन मित्र लाभणार आहे."

सदाशिवरावांच्या ह्या बोलण्याचा अभिरामला काही अर्थच कळेना. तो सदाशिवरावांकडे पहातच राहिला. बोलता बोलता सदाशिवराव स्तब्ध राहिले. कशाचा तरी ते विचार करीत असावेत. नंतर एकदम अभिरामला ते म्हणाले, "आज दुपारी मी विश्रामगावला जाणार आहे. तू येशील माझ्याबरोबर?"

"आपण तेथे जाऊन काय करणार?"

"भिऊ नकोस बाबा, अगदी भिऊ नकोस ! भीती टाकून दिल्याशिवाय माणसांच्या हातून जगात कुठलीही मोठी गोष्ट होणार नाही. विश्रामगावी सध्या जे चमत्कार घडत आहेत ते याहून मोठ्या व विचित्र अशा चमत्कारांच्या पूर्वसूचना आहेत. तो मोठा चमत्कार घडायच्या आधी आपण त्याठिकाणी हजर असले पाहिजे."

यावर अभिरामने शंका काढली. "पण... ज्या गोष्टींचा शोध पोलिसांना लावता आला नाही, तिथे जाऊन आपण काय करणार? भिण्याचा प्रश्नच नाही."

"पोलिसांना तर तपास लागणं शक्य नाही. इतकंच काय पण माझ्या इतकी ह्या गोष्टीची माहिती महाराष्ट्रात कुणालाही नसेल. माझा सारा जन्म मी ह्या अभ्यासात घालविला तो उगाच

नाही. मी हे चमत्कार पाहायला जाणारच. तू येणार की नाही याचं उत्तर दे?"

अभिराम म्हणाला, "माझी तयारी आहे."

* *

# तीन

मुंबईपासून विश्रामगाव सुमारे तीस मैलांवर होते. अभिरामने स्वतःची मोटार काढली होती. संध्याकाळी अभिराम आणि सदाशिवराव तेथे पोहोचले. सदाशिवराव म्हणालें, "माझा एक मित्र ह्या गावात रहातो. आपण त्याच्याकडे उतरलो तर त्याला आनंद होईल. आपली बडदास्त तो छान ठेवील. पण एखाद्याच्याकडे आगाऊ, न कळविता दत्त म्हणून जाऊन उभा रहायचे हे मला तरी प्रशस्त वाटत नाही."

"पण रात्र कुठेतरी काढलीच पाहिजे. उघड्या मैदानात तर झोपता येत नाही." त्यांच्या सुदैवाने तेथे 'आरामलॉज' नावाची इमारत दिसली. तेथे रहाण्याची व जेवणाची सोय होती. दोघेजण तेथे गेले. दाराशीच त्यांना एक भैया भेटला. भला धिप्पाड, पिळदार करड्या मिशांचा. आणि उग्र चेहऱ्याचा असा तो रखवालदार होता. त्याने ह्या दोघांना पाय जुळवून राम राम केला.

भैय्याजी दिसायला उग्र होते तरी मनाचे प्रेमळ दिसले. भय्याचे नाव रामचरण. सदाशिवरावांच्या सभ्य व प्रेमळ वागणुकीचा भैय्याच्या मनावर परिणाम झाला असावा. त्याने दोघांना व्यवस्थापकांकडे नेले आणि एक चांगली खोली मिळवून दिली. त्यांनी सामानासुमानांची व्यवस्था लावली. मग सदाशिवराव म्हणालें, "चल आता."

"कुठे?"

"त्या वडाच्या झाडाच्या जागेकडं."

आणि अभिरामचा हात धरून ते त्याला ओढून घेऊन गेले.

पाच-दहा मिनिटे ते चालत होते. विचारीत विचारीत ते देवीच्या मंदिरासमोर वडाच्या जागेपाशी गेले. तेथे वड नव्हता. एक खोल खड्डा होता. सदाशिवराव म्हणाले, "पाहिलंस अभिराम, वर्तमानपत्रातली बातमी अगदी खरी आहे. मी मागल्याच वर्षी येथे आलो होतो. ह्याच ठिकाणी तो प्रचंड वटवृक्ष होता. एवढा प्रचंड वृक्ष रात्रीचे रात्री नाहीसा करण्याचं काम पृथ्वीवरील माणसांच्या हातून होणे शक्य नाही."

"कोण अद्भूत शक्ती असेल?" अभिराम विचार करू लागला.

इतक्यात मंदिरातून एक पोक्त मनुष्य बाहेर आला. त्याच्या गळयात रुद्राक्षांच्या माळा होत्या. कपाळावर भलें मोठे गंध होते. त्याच्या कानातही रुद्राक्ष होते. सदाशिवरावांनी त्याला जरा निरखून पाहिले आणि विचारले,

"आपण मंदिराचे पुजारी दिसता!"

"हो, का बरे?"

"ह्या मंदिराच्या आसपास काही चमत्कार घडतात. ते

प्रत्यक्ष पाहायला आम्ही ह्या ठिकाणी आलो आहोत. आपणाला या विषयी माहिती असेलच."

"हो. हे काय विचारता? सांगतो ऐका, कधी-कधी सोसाट्यांचा वारा सुरू होतो. आकाश स्वच्छ असताना ढगांचा गड-



गडाट ऐकू येतो. अशावेळी आम्ही खिडक्या लावून घेतो. नाहीतर कान फुटायचेच."

"इथले वडाचे झाड नाहीसे झाले त्या रात्री तुम्ही कुठे होतात?"

"अहो जवळच. हे काय आमचं घरं." असे म्हणून पुजाऱ्यांने एका दुमजली घराकडे बोट दाखविले. सदाशिवरावने

विचारले, "मग तुम्हाला त्या रात्री चमत्काराची काही खबर लागली नाही का? "

"खबर लागली हो! " पुजारी सांगू लागला, "पण ही सूचना कशाची आहे हे कळेना. वादळ तर नसावं. कारण एवढा एकच वृक्ष मुळासकट उडून जातो आणि बाकीची झाडे तशीच रहातात यावरून तें वादळ तर नसावे? "

"मग हा वृक्ष कशाने उडाला असावा? "

यावर तो पुजारी काहीच बोलेंना. त्याला कापरे भरल्यासारखे झाले. तो न बोलता झटकन् निघून गेला. पण हा काहीतरी ईश्वरी कोप त्याला वाटला असावा असे त्यांना दिसले. मग सदाशिवराव व अभिराम गावात गेले. गावाची वस्ती सुमारे २०/२२ हजार असावी. छानदार बंगले, मोठी बाजारपेठ, शाळा, कोर्टाच्या सुंदर इमारती यावरून हे गाव मोठे भरभराटीचे असावे असे त्यांना वाटले. माणसांची रहदारीं चालू होती. सदाशिवराव कुणाकुणाला हटकून प्रश्न विचारीत. अर्थात् हे सर्व प्रश्न त्या चमत्कारासंबंधी असत. पण एकाही माणसाच्या सांगण्यातून काहीही खास निष्पन्न झाले नाही खरे पण वर्तमानपत्रात जे आले होते ते खरे होतें हे मात्र कळून चुकले.

अंधार पडू लागला. सदाशिवराव व अभिराम 'आराम लॉज' मध्ये परत आले. वाटेने पाहातात तो एकाएकी सर्वत्र सामसूम झाली होती. लोकांनी दारेखिडक्या लावून घेतल्या होत्या. ह्या चमत्कारांमुळे लोक किती भयभीत झाले आहेत हे स्पष्ट दिसत होते. सदाशिवराव आणि अभिराम लॉजच्या दारात आले तेव्हा दोन तरुण व्हरांड्यात आरामखुर्चीत स्वस्थ बसले होतें. नमस्कार चमत्कार झाले. त्या तरुणात एक शरिराने उंचापुरा—आडवा-

तिडवा भक्कम बांध्याचा होता. दुसरा मध्यम उंचीचा होता. सदाशिवरावनी त्यांना सहज 'या गावी का आलात?' असे विचारले. तो उंचापुरा तरुण म्हणाला, "आम्ही साताऱ्याहून आलो. या गावी काही चमत्कार घडतात असे आम्ही वर्तमानपत्रात वाचले. म्हटलं, प्रत्यक्ष पाहून खात्री करून घ्यावी." सदाशिवराव आनंदाने म्हणाले, "वाहवा, वा छान! त्याच कारणाकरिता आम्ही आलो आहोत. तुमची गाठ पडली हे ठीक झाले." ह्या तरुणांपैकी एकाचे नाव अशोक व दुसऱ्याचे रमाकांत असे होतें. त्यांच्या बरोबर हरिहर नामक ब्राह्मण होता. तोही आला. त्याच्या बरोबर ह्या मंडळीचा सोनेरी रंगाचा, बारीक पण चमकदार डोळ्यांचा, सडसडीत बांध्याचा, आणि भाबड्या चेहऱ्याचा मुका मित्र बादशहा होता. प्रथम बादशहाने सदाशिवराव व अभिराम यांच्याकडे पाहून गुरगुरायला सुरुवात केली. पण अशोकने म्हटले, "हं गप, ते आपले मित्र आहेत.' त्याबरोबर बादशहा गप्प होऊन त्यांच्यापुढे शेपूट हालवू लागला. "अरे वा! काय शहाणा कुत्रा आहे." अभिराम म्हणाला आणि त्याने बादशहाच्या डोक्यावरून हात फिरविण्यास सुरुवात केली लवकरच दोघे दोस्त बनलें. एवढ्या वेळात लॉजची घंटा झाली. आणि सर्वजण मधील हॉलमध्ये जेवणाच्या टेबलाभोवती येऊन बसले.

गप्पागोष्टी करीत जेवणे चालली असता अभिराम सहज म्हणाला, "खरंच, मागे मी 'सुधेचा शोध' नावाची एक अद्भुत कादंबरी वाचली होतीं. त्यातल्या मुख्य पात्रांची नावे आणि आपली नावे सारखीच आहेत. काय हा योगायोग!"

अशोकला हसू कोसळले. "अहो, आमचीच ती कथा आहे. आम्ही अमृताच्या शोधासाठी हिमालय पालथा घातला ती

भ्रमण गाथा आहे ती." सदाशिवराव म्हणाले, "वा ! साहसाच्या कामी निघाल्यानंतर धाडसी लोकांची मैत्री जमणे हा एक अपूर्व योगायोग आहे. मला वाटू लागले आहे की, आपल्या कार्यात खास यश येणार."

* *

# चार

जेवणे झाली. सर्वजण गोष्टी सांगत बसले. मग हळुहळू झोप त्यांच्यावर अंमल गाजवू लागली. दिवे मालवून जो तो लांब होऊ लागला. मध्यरात्री एकाएकी सर्वांची झोपमोड झाली. अभिरामला गार वारा झोंबू लागला. म्हणून अशोकने त्याला खिडकी लावून घेण्यास सांगितले. सदाशिवराव म्हणाले, "थांबा, खिडकीचे दार लावू नका."

"पण थंड वारा अंगाला झोंबतो आहे ना ?"

"बाहेर काही वादळ उठलेले नाही."

"मग हा मोठा शब्द कशाचा ?"

सर्वांनी कान टवकारले. तेव्हा लक्षावधी स्लेटपाट्यांवर लक्षावधी पेन्सिली घासल्या जाव्या तसा खरखर आवाज ऐकू आला. तो ऐकताच सदाशिवराव ताडकन् उठले, आणि त्यांनी

दरवाजा उघडला. तसा बादशहाही धावत धावत घराच्या बाहेर पडला.

सदाशिवराव दरवाजा उघडून ओसरीवर गेले, तशी बाकीची मंडळीही ओसरीवर गेली. चांदणे स्वच्छ पडलें होते. आकाशात ढगांचे नावही नव्हते तरी पण वादळासारखा सोसाट्याचा गार वारा सुटला होता. हे काय गूढ आहे हे कोणाला कळेना. "शब्द वरून येत आहेसे दिसते." सदाशिवराव म्हणाले. तें इतके बोलत आहेत तोच एकाएकीं माणसाचा तीव्र आक्रोश आणि त्याच्या मागोमाग कुत्र्याचे ओरडणे ऐकू आले. रमाकांतानें तो आवाज ओळखला आणि घाबरून म्हटले, "अरे! हा तर बादशहाचा आवाज!"

हरिहर म्हणाला, "बादशहानं काही तरी जीवजिवाणू पकडलं असेल, आणि त्याचा हा आवाज असेंल." त्यावर रमाकांत म्हणाला, "छे रे! खास बादशहाचाच आहें. त्याच्या या भेसूर ओरडण्यावरून तो स्वतःच अतिशय भ्यालेला दिसतो."

"चला, चला, पुढे जाऊन पाहू या." असे म्हणून अशोक, रमाकांत व हरिहर यांना घेऊन निघाला. बादशहाचा आवाज जिकडून आला होता तिकडे ते तिघेजण धावले. सदाशिवराव व अभिराम हेही त्यांच्या पाठोपाठ गेले. सर्वांनी शोधिले, परंतु काही पत्ता लागेना. आक्रोशध्वनी येतच होता. पण तो आता अस्पष्ट झाला होता. हरिहरने 'बादशहा, बादशहा' अशा हाका मारल्या. पण तो कुठला ओ द्यायला? सदाशिवराव म्हणाले, "बादशहा गेला आकाशात उडून." "हेच खरे. त्याचा शब्द वरून फार लांबून येत आहे." "राम-राम! माझ्या बादशहाला आकाशातल्या पऱ्यांनी नेले ना? गेला माझा बादशहा!"

हरिहर ओरडू लागला.

सवजण भयचकित दृष्टीने आकाशाकडे पाहात होते. सदाशिवराव म्हणाले, "तुम्हाला आकाशात काळे काळे असे दोन ठिपके दिसतात का ? " सर्वांनी नीट न्याहाळून पाहिले, तो खरोखरच दोन काळे ठिपके मिळून गेलेले दिसत होते. सदाशिवरावांच्या दृष्टीला आणखी एक चमत्कार दिसला. आकाशात प्रचंड वस्तू काळचा ठिपक्यासारखी दिसत होती. पणते तिच्याविषयी यावेळी मुद्दामच काही एक बोलले नाहीत. अभिरामने सदाशिवाला विचारले, "तुम्हाला याबद्दल काय वाटते ? " तेव्हा त्यांनी उत्तर दिले,

"माझे मन इतके गोंधळून गेले आहे की मला आता काहीच सुचत नाही." नंतर मंडळी बंगल्याकडे परतली.

बंगल्याजवळ एक तळे होते. तेथे येताच सदाशिवराव आश्चर्य वाटून म्हणाले, "अरे ! हे काय ? तळचात पाणी कसे नाही ?" अशोक म्हणाला, "नाही. पण त्याचे काय ?"

"अहो, संध्याकाळीच मी इकडून गेलो होतो त्यावेळी हे तळे पाण्याने तुडुंब भरले होते."

"छे हो ! तुम्ही चुकत असाल."

"नाही, नाही. मला पक्के आठवते. काठोकाठ पाणी होतं." सर्वजण गुंग होऊन विचार करू लागले "माझा बादशहा" हरिहराने डोळचात पाणी आणून विचारले. सदाशिवराव म्हणाले, "बाबा रे ! तुझा बादशहा आता कसचा येतो ? आणखी मला अशी शंका येते की, त्याच्याबरोबर एक माणूसही गेला असावा. कारण, बादशहाच्या आवाजाबरोबरच माणसाचा आवाजही मी ऐकला."

सदाशिवरावांचा तर्क खरा होता. दुसरे दिवशी विश्रामगावात बातमी पसरली की, रात्री एक चौकीदार पहारा करीत असता अचानक नाहीसा झाला !

* *

# पाच

सदाशिवरावांशी सहवास नंतर वाढत गेला. त्यांच्या ज्ञानाचे तेज त्यांच्या भाषणातून चमकू लागले आणि त्यांच्या प्रेमळ स्वभावाचा अनुभव येत गेला. आता अशोकला त्यांच्याविषयी जास्त जिव्हाळा वाटू लागला होता. रमाकांतचाही त्यांच्याविषयीचा आदर वाढतच गेला. "मला 'तुम्ही' न म्हणता 'तू' च म्हणत जा." असा अशोकने आग्रह धरला. रमाकांतही तोच आग्रह करू लागला. आणि सदाशिवरावांस नाईलाजाने तो मान्य करावा लागला. अशोक आणि रमाकांत त्यांना 'अण्णा' म्हणू लागले. अभिरामनेही तशीच हाक मारण्यास सुरुवात केली. अशोकने सदाशिवरावांस प्रश्न केला, "अण्णा, तुम्ही या चमत्काराचं मूळ शोधून काढलं म्हणता, ते कोणतं ?" त्यावर सदाशिवराव काही वेळ स्तब्ध बसले, आणि नंतर म्हणाले, "हे पहा, मी जो तर्क केला आहे तो तुम्हाला सांगतो. पण माझ्या शब्दावर तुमचा विश्वास बसणार नाही. विश्वास बसो वा न बसो. पण एवढी

खात्री करून ठेवा की मी जे काही सांगेन ते काहीतरी कल्पकतेने सांगणार नाही. माझ्या प्रत्येक गोष्टीला भौतिक शास्त्राचे प्रमाण देता येईल. या विषयासंबंधाने शेकडो पाश्चात्य शास्त्रज्ञ आज विचार करीत आहेत. मीही आज कित्येक वर्षे ह्या विषयाचा शोध करीत आहे. अशोक मध्येच म्हणाला, "पण अण्णा, शास्त्राचा आणि चमत्काराचा संबंध काय?"

"संबंध नाही कसा? पुष्कळच आहे. अशोक, तुला ठाऊक आहे ना की पृथ्वीप्रमाणे बुध, शुक्र, गुरू इत्यादी ग्रह सूर्याभोवती फिरतात?"

"हों, हो. ठाऊक आहे. आणि हेही ठाऊक आहे की पृथ्वी हा एक ग्रह असून त्याला सर्वात जवळ असा जो ग्रह आहे त्याला मंगळ म्हणतात"

"युरोपखंडात आणि अमेरिकेत शास्त्रज्ञांनी मोठमोठ्या दुर्बिणी तयार केल्यात. त्यांच्या सहाय्याने हे हजारो मैलांवरचे ग्रह त्यांना स्पष्ट दिसतात. त्यावरून त्यांनी सप्रमाण असा सिद्धांत काढला आहे की पृथ्वीप्रमाणे यातल्या कित्येक ग्रहावरही प्राण्यांची वस्ती आहे. शास्त्रज्ञांचे असे म्हणणे आहे की मंगळ ग्रहावर मोठाली विस्तीर्ण वाळवंटे आहेत आणि मनस्वी थंडी आहे. यामुळे व पावसाच्या अभावामुळे तिथं वनस्पती नाही. पण शेकडो योजने लांबीचे कालवे पुष्कळ आहेत. ते इतके सरळ व रेखीव आहेत की तें स्वाभाविक असणे शक्य नाही. अर्थातच ते मनुष्य किंवा त्यांच्यासारखा कुणी प्राणी यांनीच बनविलेले असले पाहिजेत आणि पाण्याची टंचाई असता व सर्व प्रदेश रुक्ष असता शेकडो योजने लांबीचे कालवे खणून जे प्राणी जिवंत राहिले आहेत ते

बुद्धिवान आणि कर्तबगार असले पाहिजेत याबद्दल बिलकूल शंका नाही."

अभिराम म्हणाला, "ही माहिती मी तुमच्या तोंडून अनेक वार ऐकली आहे. परंतु ह्या माहितीचा आणि इथे होत असलेल्या चमत्कारांचा संबंध काय?''

"तेच ऐक. मग क्रमाक्रमानें सर्व काही समजेल. तुम्हाला ठाऊकच आहे की ठराविक वेळी एकदा मंगळ ग्रह पृथ्वीच्या अगदी जवळ येतो. काही दिवसात वर्तमानपत्रात अशी एक बातमी प्रसिद्ध झाली होती की अलीकडे अंतरिक्षातून काही चमत्कारिक संदेश येत असतात. असे आढळून आले आहे. याचा अर्थ कुणालाही कळला नाही. ते कुठून येत होते तेही कळले नाही. शोधाअंती असें दिसून आले की मंगळ ग्रह त्यावेळी पृथ्वीच्या अगदी नजीक आला होता. अर्थात् मंगळावरच्या लोकांनीच पृथ्वीवरील लोकांशी बोलण्याच्या इच्छेनं काही संदेश पाठविलेले असलें पाहिजेत असं म्हणणं भाग आहे. पण त्यांची भाषा आपल्या भाषेहून अगदीच निराळी पडली. त्यामुळे त्यांचा अर्थ पृथ्वीवरील माणसांना कळला नाही. दुसरी एक बातमी तुम्ही वाचली असेल. काही अमेरिकन शास्त्रज्ञांनी विमानात बसून आणि एका धाडसी माणसाने तर दारूने उडणाऱ्या जंगी बाणात बसून मंगळग्रहावर जायची तयारी केली होती!

"तो बाण आपण दिवाळीत सोडतो, तसा वितभर लांबीचा नव्हता. त्याच्या हजारो पट वेगळा व मोठा असून त्यात बसण्यासाठी धातूच्या पत्र्याची एक खोली केली होती. तिच्याखाली दारूचं कोठार होतं. आता पुनः मंगळ ग्रह पृथ्वीच्या जवळ आला म्हणजे हा बाण उडविण्यात यावयाचा आहे. या प्रयोगाची पृथ्वी-

वरच लहानशी तालीमही करून पाहता येण्यासारखी आहे. माझी खात्री आहे की काही काळाने मंगळ आणि पृथ्वी यांच्यात दळण-वळण सुरू होणार. मला अशी शंका येते की सध्या येथे चाललेले चमत्कार मंगळावरील माणसेच बहुधा करीत आहेत. पृथ्वीवरील निरनिराळ्या वस्तू नेऊन त्याचा संग्रह करावा असा त्यांचा बेत दिसतो."

अभिराम व अशोक दोघे आश्चर्यचकित होऊन म्हणाले, "खरंच की काय?"

"यात आश्चर्य वाटण्यासारखं काय आहे? आज येथे चाललेले चमत्कार तेच करीत आहेत. याविषयी माझी बहुतेक खात्री आहे. तेच पृथ्वीवरील एक एक जिन्नस नेत आहेत."

"पण तो कसा नेतात?"

"ते मला आता नक्की सांगता येत नाही. माझा आपला एक तर्क आहे. तो संभवनीय असेल अगर नसेल. माझी समजूत आहे की आपल्या पृथ्वीभोवती कित्येक मैलापर्यंत हवेचे आवरण आहे. त्या आवरणाच्या पलिकडे सगळी पोकळी आहे. तरी पण या पोकळीत जे ग्रह आहेत त्यांच्याभोवती एकेक स्वतंत्र वातावरण बहुधा आहे. पण या ग्रहावरून पृथ्वीवर यावयाचे किंवा पृथ्वी-वरून या ग्रहावर जावयाचे झाले, तर मधल्या पोकळीतून जावे लागणार हे उघड आहे अशी माझी समजूत आहे. हें मंगळावरचे लोक पाणबुड्या नौकेप्रमाणे हवाबंद पण आत प्राणवायूचा पुरवठा असलेल्या अशा मुद्दाम तयार केलेल्या विमानातून येत असावेत.... काल बादशहाचा आणि चौकीदाराचा आक्रोश ऐकू येत होता. आणि आपण आकाशाकडे पाहात उभे होतो. त्यावेळी आकाशात प्रचंड काळ्या ठिपक्यासारखे दिसले ते त्यांचे विमानच असावे."

सदाशिवरावांचे भाषण ऐकल्यावर सर्वजण स्तब्ध राहून विचार करू लागले. त्यांनी काढलेली कल्पना आतापर्यंत कोणाच्या स्वप्नातही आली नव्हती. काही वेळाने अशोक म्हणाला, "पण हे मंगळावरचे लोक येथे आज दोन महिने असा धुडगुस घालीत आहेत तरी येथील लोकांपैकी ते कोणालाच कधीही दिसले नाहीत. हे कसे?" ही शंका ऐकून सदाशिवराव क्षणभर कुंठित झाल्यासारखे दिसले. तथापि ते म्हणाले, "तुझी शंका बरोबर आहे. मला असे वाटते की हे लोक जमिनीवर न उतरता वरचेवर राहूनच इथल्या वस्तू पळवीत असले पाहिजेत."

"ते कसे शक्य आहे?"

"सांगतो. तू Vacuum cleaner (व्हॅकूअम क्लिनर) नावाचे यंत्र पाहिले आहेस ना?"

"हो. पाहिले आहे. एक यंत्र असते. त्याला एक नळी जोडलेली असते. या नळीचे तोंड धुळीवर धरतात. आणि यंत्र चालविल्यावर आतून मोठा शब्द करीत हवा बाहेर पडते आणि लागलीच नळी धुळीत शिरते. या रीतीने जागा लवकर स्वच्छ होते."

"असेच एखादे यंत्र या मंगळावरील लोकांजवळ असावे. त्याच्या सहाय्याने ते जमिनीवरील जिन्नस किंवा प्राणी आकर्षून वर घेत असतील. असे चमत्कार होण्याच्या वेळी अतिशय थंड आणि सोसाट्याचा वारा सुटल्यासारखा आपणाला वाटतो त्याचे कारण हेच असावे."

यावर विशेष कुणी बोलले नाही. सदाशिवरावांचा तर्क सर्वांना पटला. मंगळावरील लोकांचेच हे उपद्व्याप असावेत याबद्दल कोणाला शंका उरली नाही. आमच्या तरुण मित्रांना सदाशिवरावांबद्दल आदर वाटत होताच. तो त्यांच्या शोधामुळे शतपटीने वाढला."

हरिहराला मात्र बादशहा कायमचा गेल्याबद्दल जे दुःख झाले तें अतोनातच ! शेवटी सदाशिवरावांनी त्यांची पुष्कळ समजूत घातली आणि बादशहा पुनः मिळण्याचाही संभव आहे असे सांगितले. तेव्हा त्याला अंमळ बरे वाटले.

* *

# सहा

एके दिवशी संध्याकाळी सदाशिवराव आणि आमचे तरुण मित्र हिंडावयास निघाले. सुमारे तास दीड तास हिंडून अंधार पडू लागल्यावर मंडळी परतली. मंडळी तळ्याजवळ येताच सदाशिवराव दचकून उभे राहिले. कारण, तळ्यात आता पाणी दिसत होतें. परवा त्यात मुळीच पाणी नव्हते. त्यापूर्वी हेंच तळे पाण्याने तुडूंब भरले होते; आणि आता त्यात फिरून पाणी दिसू लागले हा चमत्कार आहे तरी काय ? याचा उलगडा होईना. सदाशिवराव म्हणाले, "तळ्यातले पाणी मंगळावरील लोक ज्या यंत्राने शोषून नेत असतील ते यंत्र केवढे प्रचंड असले पाहिजे ! तसेच ज्या विमानाला हे यंत्र जोडले असेल तें विमानही केवढे मोठे असेल ! एरव्हीं वटवृक्ष, होडी व इंजिन यांसारख्या अवजड वस्तू त्यांना कशा नेता येतील ?"

इतक्यात त्या तळ्यात धप्‌दिशी काही पडल्याचा भास झाला. सर्वजण विस्मित होऊन वर पाहू लागले. आकाशात खूप उंचावरून काही काळे काळे दिसत होते. सदाशिवराव म्हणाले, "अरेरे ! मी आपली दुर्बीण घरी विसरून आलो, नाहीतर काळी वस्तू काय आहे हे सहज ओळखता आलं असतं." अशोक म्हणाला,

"पण आकाशातून तळ्यात काय पडले तें तर पहाल अगोदर?"

असे म्हणून अशोक तळ्याच्या काठाकाठाने शोधू लागला. इतर मंडळीही त्याच्या पाठोपाठ गेली. शोधता शोधता अशोक एकदम ओरडून म्हणाला, "अहो, हे पहा काय आहे ते!" त्याच्या आरोळीने सारेजण दचकले, आणि त्याच्याकडे धावत गेले. पाह-



तात तो एक मोठा थोरला मासाचा गोळा तळ्यात पडलेला दिसला. फार उंचीवरून पडल्याने त्याचा इतका चेंदामेंदा झाला होता की, हे माणसाचे शरीर असेल असे ओळखता येत नव्हते. पण काही अवयव अस्पष्ट दिसत होते, त्यावरून त्याला माणसाचे शरीर म्हणावयाचे.

अभिराम म्हणाला, "बिचारा कोणी दुर्दैवी प्राणी विमानातून सुटका करून घेण्यासाठी उडी टाकून पडला असावा असे दिसते."

इतर मंडळींनाही तसेच वाटले. पण सदाशिवरावांनीं त्या मास-पिंडाकडे बारकाईने पाहून सांगितले, "तुम्ही चुकता आहा. हा माणूस उडीं टाकून पडलेला नाही. पडण्यापूर्वीच याला मृत्यू आला असला पाहिजे."

"हा तर्क तुम्ही कशावरून केला?"

"या माणसाचे डोके आणि हात कापून घेऊन कोणीतरी हा गोळा खाली टाकून दिला असावा. कारण, माणसाने उडी घेतली असती तर तो ओरडला असता. तसंच तो आपटून मेला असं दिसत नाही. त्याचं डोकं अगदी शस्त्रानं कापल्यासारखं दिसतं."

"हे काय? हाताची कातडीसुद्धा सोललेली दिसते! छाती आणि हात यातील मास सूरीनं कापून घेतलेलं आहे वाटतं?"

"बरोबर. डॉक्टरलोक शस्त्रक्रिया करताना जसं सफाईनं शस्त्र चालवितात तसं यावर चालविलेलं आहे."

"पण असं करण्यात त्यांचा हेतू काय?"

"हेतू हा की, मनुष्यप्राणी कसा असतो, त्याच्या शरीराच्या आत काय काय असतं, तें पहावयाचं. यावरून माझा असा तर्क धावतो की मंगळ ग्रहावरच्या माणसांची शरीरें आपल्यासारखी खात्रीने नसावीत. ती आपल्यासारखी असती तर अशा तऱ्हेने शवच्छेद करून पहाण्याचं काही कारण नव्हतं. बरं, पण मंगळ-ग्रहावरून विमान आलं आणि त्यातल्या लोकांनी येथून इंजिन वगैरे वस्तू उचलून नेल्या, अशी आता तरी तुमची खात्री झाली ना?"

या प्रश्नास उत्तरादाखल कोणीच काही बोललं नाही.

बोलतात काय ? 'चक्षुर्वै सत्यम्' तेथे शंकेला जागाच कोठे राहिली होती ?

हरिहर म्हणाला, "पण रावसाहेब, तळ्यात या मासाच्या गोळ्याबरोबरच आणखी काही जिन्नस पडले की काय हे नको का पहायला ?"

"ते पहाण्याची जरुरी नाही. काही असेलच तर अशाच कोणा दुर्दैवी प्राण्याचे चेंदामेंदा झालेलं शरीर असेल. मंगळावरच्या लोकांनी नीट परीक्षा केल्यावर ते खाली टाकून दिलं असेल."

"मला तर बुवा आपल्या बोलण्याचा काहीच उमज पडत नाही. आकाशात देवाची वस्ती असते असं आजवर ऐकत आलो. ते देव फिरत फिरत पृथ्वीवर आले की काय ?"

इतके बोलून हरिहर वर आकाशाकडे पाहू लागला आणि त्याने भक्तियुक्त अंतःकरणाने दोन्ही हात जोडून नमस्कार केला.

अशोक म्हणाला, "हरिहर, तू येथून चालता हो कसा ! याठिकाणी तुझा हा देवभोळेपणा उपयोगाचा नाही."

"इतकं रागावयाला काय झालं ? मी आपला इंग्रजी न शिकलेला, साधाभोळा माणूस म्हणून देवाला नमस्कार केला. त्यात काय बिघडलं ?"

या भाषणाने अशोक अधिकच संतापला आणि म्हणाला,

"पुरे पुरे. तुझ्या नमस्कारानं देव संतुष्ट होऊन तुला त्याचेकडून बोलावणं येईल आणि मग तुला त्याच्या दर्शनासाठी स्वर्गलोकाला पाठविण्याचं काम आम्हाला करावं लागेल. आवर आपले तोंड."

अभिराम म्हणाला. "ही भांडण्याची वेळ नव्हे. प्रसंग किती

भयंकर आहे ते अगोदर पहा. मंगळावरचे लोक आपल्या पृथ्वीवर उतरून माणसाला उचलून नेतात आणि त्याचा खून करतात. आपण हे शांत-पणाने पहावयाचे का त्याचा काही बंदोबस्त करावयाचा ? हेअगोदर ठरविलं पाहिजे."

"बंदोबस्त करायलाच हवा. नाही कोण म्हणतो ? पण आणखी कोणकोणती संकटं आपल्या या पृथ्वीच्या प्राण्यांवर यावयाची आहेत याची कल्पना आहे कोणाला ? आज विश्राम-गावावर प्रसंग आला आहे. उद्या असे प्रसंग साऱ्या जगावर येतील."

"पण कसा बंदोबस्त करणार ?"

"तें आताच नाही मला सांगता येत. तरी पण मी ही सारी हकीकत आजच्या आज लिहून वर्तमानपत्राकडं पाठविणार आणि लोकांना खडबडून जागं करणार. लोकांना खरा प्रकार कळला पाहिजे. कारण नुसते आपण तिघं चौघेजण काय करू शकणार ? सगळ्या लोकांनी या कार्यासाठी एकजूट करणं अवश्य आहे."

"अण्णा, पण आपण लोकांना ही गोष्ट सांगू लागलो तर ते उलटे आपणालाच वेड्यात काढतील. त्याची वाट काय ?"

"त्यांनी तसं केलं तर मरा म्हणावं आणि स्वस्थ बसावं. दुसरे काय करणार ? माझा युक्तिवाद आणि प्रत्यक्ष प्रमाण या दोहोंनीही जर त्यांची खात्री पटली नाही, तर आमचा नाइलाज आहे. आम्ही आमचं कर्तव्य केलं एवढं बस झालं."

इतकं बोलणं होत आहे तो बराच वेळ झाल्यामुळे सर्वजण डाकबंगल्याकडं परत जाण्यास निघाले. अजून आकाशात काळा ठिपका दिसतच होता. पण तो हळुहळू लहान व अस्पष्ट होत चालला होता.

अशोक आश्चर्यचकित होऊन आपल्या मनात म्हणाला, "साऱ्या जगातले लोक जे ऐकून भयाने कुंठित होऊन जातील असं कोणतं गूढ रहस्य या काळ्या छायेच्या आड दडून बसलं आहे तें परमेश्वर जाणे!"

** **

# सात

## एका दिवसात प्रसिद्धी!

एके दिवशी सकाळी अशोकने वर्तमानपत्राचा ताजा अंक हाती येताच मोठ्या उत्सुकतेने तो उघडला. कारण, या अंकात सदाशिवरावांचा लेख यावयाचा होता. अंक उघडताच त्यात पुढील मथळा दिसला–

**'विश्रामगावच्या चमत्कारांचें रहस्य'**

**'आकाशातून पडलेले माणसाचे शव!'**

या जाड ठशांच्या मथळ्याखाली एक लेख छापला होता. त्यात विश्रामगाव येथे घडलेल्या चमत्कारांचे प्रथम वर्णन देऊन पुढे मोठ्या जाड अक्षरात असे छापले होतें–

**'मंगळग्रहावरच्या लोकांची अचाट कृत्ये!'**

**'पृथ्वीवर येऊन बेतलेले भयंकर संकट!'**

**'तज्ज्ञानें लाविलेला शोध'**

त्या खाली सदाशिवरावांचा लेख होता. लेखाच्या शेवटी संपादकांनी चार शब्द लिहिले होते. ते असे :–

"श्री. सदाशिवराव यांनी वरील लेखात ज्या आश्चर्यकारक गोष्टींचा उल्लेख केला आहे, त्या इतक्या कल्पनातीत आहेत की त्या ऐकून कोणी लेखकाला वेडयात काढील. पण त्यांच्या मताचे समर्थन करण्याखेरीज गत्यंतरच नाही. कारण, अनेक वर्षांचा व्यासंग, चिंतन, खोल विचार व प्रत्यक्ष प्रमाण या सर्वांच्या आधारावर श्री. सदाशिवराव यांचे मत प्रतिष्ठित झालेले असल्यामुळे त्यांनी काढलेले सिद्धांत अग्राह्य होण्याचा संभवच नाही. मंगळावर माणसांची वस्ती आहे ही गोष्ट तेच एकटे सांगत आहेत. असे नसून अनेक पाश्चात्य शास्त्रज्ञांचेही असेच मत आहे. फार काय, पण बिनतारी तारायंत्राचा संशोधक मार्कोनी यानेसुद्धा मंगळावरील लोकांशी संदेशव्यवहार करण्याचा यत्न केला होता. सारांश, श्री सदाशिवरावांच्या मताला शास्त्राचा भक्कम आधार आहे. विश्रामगावच्या चमत्कारांचे रहस्य उकलावयाचे असेल तर ते असे उकलावयास पाहिजे. ते उकलण्यावाचून आता गत्यंतरही नाही. कारण, वेळीच सावध होऊन प्रतिकार न केल्यास पुढे काय काय अनर्थ ओढवतील ते सांगता येत नाही."

हा सर्व मजकूर सदाशिवरावांना दाखवून अशोक म्हणाला, "ह्या संपादकाचेही मत तुमच्या मताशी जुळतेच आहे." यावर सदाशिवराव हसून म्हणाले, "अरे, ज्याला डोकं आहे असा कोणताही मनुष्य हेच म्हणणार."

संध्याकाळी सदाशिवरावांकडे माणसांची सारखी रीघ लागली. मोठमोठे शेट सावकार व धनिक लोक, वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी व सरकारी अंमलदार असे लोक सदाशिवरावांशी दोन

शब्द बोलण्याच्या इच्छेने एकसारखे येऊ लागले. वर्तमानपत्रातील लेखामुळे सदाशिवराव लोकांना चांगले माहीत झाले. आपल्या शब्दांवर लोकांचा विश्वास वसणार नाही अशी सदाशिवरावांना पहिल्याने भीती वाटत होती. पण अनुभव अगदी उलट आला. लोकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देता देता सदाशिवराव बेजार झाले. सदाशिवराव हा एक विद्वान, विचारी आणि कल्पक मनुष्य आहे अशी सर्वांची खात्री झाली. शेवटी पोलीस सुपरिटेंडट आले. त्यांचे सदाशिवरावांशी बराच वेळ एकांतात बोलणे झाल्यावर ते म्हणाले, "तुमची शंका बरोबर दिसते. रात्री गावाभोवती सशस्त्र पोलिसांचा पहारा बसवावा नाही ?"

"तो कशाला ?"

"मंगळावरून विमान आले की आपले शिपाई गोळ्या झाडतील."

सदाशिवराव थोडा वेळ विचार करून म्हणाले, "करून पहा पाहिजे तर. पण ते विमान कोणत्या पदार्थाचे केलेले आहे कोणास ठाऊक ! आमच्या बंदुकीच्या गोळ्यांनी कदाचित् त्या विमानाला इजा होईल; कदाचित् होणारही नाही. निश्चित असे काही सांगता येत नाही.

यानंतर हळुहळू रात्र पडू लागली म्हणून भेटावयास आलेली मंडळी सदाशिवरावांचा निरोप घेऊन घरोघरी परत गेली. सदाशिवराव आज फार थकले होते. त्यामुळे त्यांनीही लवकरच अंग टाकले. अशोक हसत हसत म्हणाला, "तुम्ही एका दिवसात प्रसिद्ध झालात बुवा ! " सदाशिवराव शून्य मनाने म्हणाले, "नको रे बाबा, 'ज्याच्या अंगी मोठेपण । तया यातना कठीण ।' ही तुकोबांची उक्ती खरी आहे. मला काय हवेसे वाटते सांगू ?"

अशोकने गंभीर होऊन विचारले, " काय ? "

" अज्ञातवास. "

" तो आता मिळणे शक्य नाही. तुम्ही कोठेही छपून राहिलात तरी लोक तुम्हाला शोधून काढतील. " " तसे असेल तर मला मंगळ ग्रहावरच गेलें पाहिजे. आजच्या एका दिवसातच बोलून बोलून माझे तोंड दुखू लागले आहे. जिभेला क्षणभर विश्रांती कशी ती मिळाली नाही. "

* *

# आठ

" अरे ! अण्णा गेले कुठं ? "

" मी तेच विचारतो. सकाळपासूनच त्यांचा पत्ता नाही "

" चमत्कार आहे बुवा. "

अशोक, अभिराम, रमाकांत एकमेकांना म्हणत होते. सकाळपासून ही माणसांची झुंबड सुरू होती. पण सदाशिवराव त्यांच्या खोलीत नव्हते. बागेत नव्हते. मंडळींनी आसपास शोध केला.

कुठेच सापडले नाहीत ते.

शोधतशोधत सारे वेळूच्या बेटावर आले. हिरवेगार कळक वर डौलात हालत होते. वारा त्यातून वाहतांना गोड शीळ ऐकू येत होती. काही सळसळल्याचा आवाज झाला.

वंश्रामगावात अलीकडे चित्त्यांचा उपद्रव फार झाला आज कुणाचे कुत्रेच चित्त्याने नेले तर उद्या कुणाच्या ावर झडप घातली असे चालले होते. कळकांच्या जाळीतली ळ ऐकून अशोकला वाटले, चित्ता इथे कदाचित् दबा धरून ला असावा. त्याने पिस्तूल काढले आणि सळसळ आली त्या खाने नेम धरला.

"हं : हं : हं : अशोक माझ्यावर पिस्तूल चालवणार की काय ? " सदाशिवराव जाळीतून बाहेर येत म्हणाले.

"वा : अण्णा बहार केलीत. सकाळपासून कुठे दडी मारली होती? आमचा जीव उडून गेला होता. आमच्या या हरिहरनं बहिरोबाला नवससुद्धा केला."

"हो, मी म्हटलं अण्णा सुखरूप येऊ देत. मी सव्वा रुपयाचे पेढे वाटीन." हरिहरने सांगितले.

"छान" सदाशिवराव हसत म्हणाले, "अरे, मी बडबडीला नि प्रसिद्धीला कंटाळून गेलो होतो. म्हणून हे निवांत ठिकाण गाठलं. स्वस्थ आकाशाकडं पहात पडलो होतो."

"अण्णा, विश्रांती मिळाली असेल चांगली."

"तर, आणखी एक फायदा झाला."

"तो कोणता?"

"समोर माळावर मुलं पतंग उडवीत होती. इतक्यात आकाशातून हजारो पेन्सिली पाट्यांवर घासल्या जात आहेत असा आवाज येऊ लागला. मी जाळीआडून वर येऊन पाहू लागलो तो एक प्रचंड छाया फिरत फिरत खाली उतरत होती. मुलं पतंग वरवर नेण्याचा जिवापाड प्रयत्न करीत होती, पण लगेच दोरी तुटली. ती खाली आली. पण पतंग आला नाही. पतंग त्या

छायेत गुप्त झालेला दिसला. ”

“कसली होती ती छाया ?”

“ते मंगळावरचं विमान असावं. खूप मोठ्ठं वाटलं. जवळ-जवळ मैलभर लांब असेल.”

“बाप रे. चला चला बंगल्यात जाऊ.” हरिहर घाबरून म्हणाला.

“काय भित्रा माणूस आहे हा?” सर्वांनी त्याची चेष्टा केली. पण त्याला कापरे भरले होते. आणि अक्षरशः घाम सुटला होता.

काही लष्करी पोलीस तिथे आले. त्यांच्या हातात बंदुका होत्या. पण त्यांचा काय उपयोग ? त्यातल्या गोळ्या मंगळाच्या विमानापर्यंत कशा जाणार ? इतक्यात चंद्र वर आला. सारी सृष्टी दिसू लागली. डोंगर, झाडे, घरे चांदण्यात न्हाऊन निघाली. तोच तो आवाज पुन्हा सुरू झाला. वेळूच्या बेटातून आणि झाडाझुडपातून सूँ-सूँ-सूँ-सूँ ........ असा शब्द येऊ लागला. फार गार होता. आवाज जवळजवळ येत होता.

“सावध ... .. सावध ......” सदाशिवराव ओरडले. पोलिसांनी बंदुकांच्या फैरी झाडल्या. पण गोळ्या कशालाच लागल्या नाहीत. इतके होते आहे तो सदाशिवराव आणि हरिहर यांची शरीरे त्या प्रचंड छायेकडे आकर्षिली गेली. तीच स्थिती अभिराम, रमाकांत आणि अशोक यांची झाली. काहीच करता येत नव्हते. नदीच्या पुरात लाकडाचे ढलपे जसे वहात जातात तशी या मित्रमंडळींची शरीरे वर आपोआप खेचली जात होती.

........वर वर त्या प्रचंड काळ्या छायेकडे.

अंगात होते नव्हते तेवढे बळ खर्च करून सदाशिवराव भूमीच्या दिशेने खाली उतरण्याचा प्रयत्न करीत होते. पण छे !

झंझावातामध्ये वाळलेल्या पानाचे बळ काय पुरे पडणार? थोड्या वेळाने गती थांबली. त्यांना भोवळ आल्यासारखे झाले होते. काही वेळ एका पृष्ठभागावर ते पडले. सदाशिवराव जरा भानावर आले. थोड्या स्वस्थपणाने भोवती पाहू लागले. त्यांनी भोवती चाचपून पाहिलें तो निळा काचेसारखा पारदर्शक पदार्थ होता. त्यांनी जरा



निरखून खाली पाहिले तो काय ? पृथ्वीवरची झाडे, घरे, दिवे सर्व काही दिसत होते. पण लांब लांब जात होते. भोवताली पारदर्शक पातळ पण भक्कम काचेचे घर होते. हे मंगळावरचं विमान आहे हे सदाशिवरावांनी ओळखलं.

"अण्णा !"

कुणी हाक मारली ? पाहतात तो पलीकडे अशोक भिंतीशी

टेकून बसलेला आणि पलिकडे रमाकांत सचिंत बसलेला. हरिहर थरथर कापतो आहे. ठीक, काही का होईना. पण सारी आपली माणसं एके ठिकाणी आहेत हे काय थोडं आहे असं समाधान सदाशिवरावांना वाटलं.

"आपण कुठे आलो ? कुठे चाललो आहोत?"

अशोकने घोगऱ्या आवाजात विचारले. सदाशिवरावांनी सांगितले, "अशोक हे मंगळावरचं विमान आहे. आणि आपण मंगळावर चाललो आहोत. म्हणजे आपणाला "मंगळे" लोक मंगळावर नेत आहेत." इतके सांगितल्यावर सदाशिवराव शांतपणे त्या जगड्व्याळ विमानाचे निरीक्षण करू लागले.

* *

## नऊ

"ओ हो केवढे हे विमान आहे !"

"आपल्या पृथ्वीवरच्या लोकांना कल्पना यायची नाही. बाकी आता आपणही मोठमोठी विमाने बनवू लागलो आहे म्हणा." सदाशिवराव म्हणाले, "दिवा पाहिलात का?" त्यांनी विचारले "कुठाय, कुठाय?" सर्वजण ओरडले. "रेडियमच्या साह्यानं प्रकाशाची व्यवस्था केली आहे हे पाहिलंत का? तळ, छत हे सारं पारदर्शक आहे. बाकी चोहीकडे काळा रंग. आणि

आपण व्हॅक्यूम क्लीनर सारख्या यंत्राने वर आलो पण या खोलीत कसे पडलो ? काही कळत नाही..."

"एक धक्का लागून अर्धवट बेशुद्ध झालो. कुणीतरी वर खेचत होतं आपणाला... एवढं आठवतं..."

एका घंटेच्या आकाराची प्रचंड वस्तू विमानाला अडकलेली दिसत होती. प्रचंड म्हणजे केवढी म्हणता, तिचा घेर असेल ५०० फूट आणि उंची असेल ३०० फूट. पण हे अवाढव्य आकाशयान चालविणारी माणसं कुठं होती ? त्यांची चाहूल काही लागेना. आपण कुठे चाललो आहोत कुणाला कळेना, पृथ्वीच्या भोवतालचे वातावरण आता आपण ओलांडले. ऑक्सिजनचा पुरवठा कसा होत आहे कळत नाही. त्याचा तर्क माणसं करू लागली. या विमानातून आपण बाहेर पडलो आणि अथांग आकाशात पाहू लागलों तर हवेचा दाब नसल्याने ते सहज शक्य होईल असे नाना तर्क मंडळी करू लागली.

इथून पृथ्वीवर फोटो पाठविता येतील का ? असा विचार अशोक करू लागला. पण या गोष्टीची व्यवस्था आपण अगोदर करून आलो नाही तेव्हा तो बेत कसा सिद्धीला जाणार ? पृथ्वीवरल्या शास्त्रज्ञांना एका पर्वतप्राय विमानाने आपणाला पळविलें आहे हे ठाऊक नाही. नाहीतर आपल्या गतीकडे त्यांनी सूक्ष्म लक्ष दिले असते. कदाचित खाली पुनः कसे उतरायचे याचे काही तंत्र त्यांनी शोधले असते. आणि कुठल्यातरी युक्तीने तें आपणापर्यंत पोचविले असते.

एक ना दोन, अनेक कल्पना येत. त्या स्वतःच विसरून जात. हरिहर जर सोडला तर इतर मंडळी शूर होती. त्यांना प्राणाची पर्वा नव्हती असं नाही पण पुढे आपलं व्हायचं काय ?

हा प्रश्न प्रत्येकांपुढे 'आ' वासून उभा होता. त्यामुळे जो तो मनात अस्वस्थ होता. सदाशिवराव एकटे काय ते खुषीत होते. ज्ञानाचे एक अफाट क्षेत्र आपणाला पाहायला मिळत आहे या कल्पनेने त्यांना अपार आनंद झाला होता. इतरांना त्यांच्या त्या आनंदाचा अचंबाच वाटत होता असे नाही, तर थोडासा रागच आला होता. अशोक चिडून म्हणाला, "अण्णा, तुमचा आनंद फार थोडावेळ टिकणार आहे. ते मंगळावरचे लोक जर का आपल्याला छळू लागले, त्यांनी आपणाला गाड्याला जुंपले तर डोळ्यापुढे काजवे चमकतील. मी तर काही सहजासहजी मान वाकवणार नाही. मरायची वेळ आली तरी दोन तीन लोकांना यमसदनाला पाठवीन आणि मग प्राण सोडीन. हे पहा पिस्तूल आहेच माझ्याजवळ." रमाकांत म्हणाला, "अरे, माझ्याही हातात पिस्तूल होतं. पण थंडगार, सोसाट्याचा वारा सुटला व ते गळून पडले. पण चमत्कार असा की पुन: ते आपोआप वर आलं."

सदाशिवराव मध्येच म्हणाले, "बाबांनो, तुमचा उत्साह अगदी पोरकट वाटतो. ज्या लोकांनी वडासारख्या आणि तळ्यासारख्या गोष्टी लीलेनं वर उचलून घेतल्या. त्यांचं सामर्थ्य किती असलं पाहिजे. लहानशा दोन पिस्तुलांनी तुम्ही काय सामना देणार त्यांच्याशी ?" "पृथ्वीवर परतता आलं नाही तर काय करायचं? अण्णा." "मंगळावर राहू. नवीन तऱ्हेचं जीवन जगायला मिळेल." पण अण्णांच्या या बोलण्याने कुणाला फारसा उत्साह आलेला दिसला नाही. थोडा वेळ थांबून अण्णा शांत स्वरात बोलू लागले, "तुम्हाला नाउमेद करतोय मी असं समजू नका. तुमच्या बहादुरीची पूर्ण जाणीव आहे मला. पण उगाच भिंतीवर डोकं आपटून मरून जाण्याची कल्पना मला पसंत नाही.

अगोदर नेमकं काय होणार आहे हे आपणाला ठाऊक नाही. दगडाखाली हात सापडला आहे. तो युक्तीनंच सोडवून घेतला पाहिजे. आपण दोनचार लोकांनी प्रतिकार करून काय होणार ? आपणाला पळवून आणणाऱ्या लोकांची विद्या, तंत्र, शिकू आणि मग देऊ त्यांना शह. हात चोळीतच बसले पाहिजेत." सदाशिवरावांच्या या बोलण्याने सर्वांना धीर आला.

"इतक्यात समोरची भिंत हळुहळू सरकू लागली. डॉंग... डॉंग्......डॉग् .....धप्.. ...धप्" असे काही आवाज येऊ लागले.

"सावध" सदाशिवरावांनी सर्वांना इषारा दिला. भिंत बाजूला सरकताच समोर अद्भूत दृष्य दिसू लागले. सगळे चकित, भयभित झालें. हरिहरची तर गाळण उडाली. तो थरथर कापू लागला. "शंभो, मला वाचव." अशी आर्त प्रार्थना त्यानं सुरू केली. हे यमदूत आपणाला यमाकडे न्यायला आले आहेत असे त्याला वाटले. आपण जागे आहोत की स्वप्नात आहोत हे त्या सर्व मंडळींना कळेनासें झाले.

कसले भयंकर दृष्य पाहिलें त्यांनी?

* *

# दहा


भिंत बाजूला सरली आणि समोर एक विचित्र प्राणी येऊन उभा राहिला. काय भयंकर रूप होते त्याचे! डोके मोठ्या भोपळ्या-एवढे, कपाळ उंचच उंच, डोळे क्रिकेटच्या लाल चेंडूसारखे लाल-भडक होते. कान म्हणजे दोन शिंगे. चेहरा त्रिकोणी होता. आणि जिवणी बाकदार होती. उंची असेल फार तर तीन फूट. त्यापैकी डोके आणि तोंड यातच फूट दीड फूट गेला. हातापायाच्या काड्या, अंगात लाल रंगाचा बुशकोट आणि पायात शुभ्र लांडी विजार होती. कमरेला एक छोटेखानी तलवार, असेल आपल्या पाव कापायच्या सुरीएवढी. हा प्राणी पाहून भय आणि आश्चर्य यात सगळे बुडून गेले.

या बटुमूर्तीने बराच वेळ टक लावून पाहिले. नंतर कर्कश चित्कार केला. तो काय तसल्याच विचित्र प्राण्यांची एक पलटणच तेथे येऊन दाखल झाली. प्रत्येकाच्या हातात एक एक भाला होता.

अभिराम सदाशिवरावांच्या कानात हळूच म्हणाला, "ही मंगळावरची माणसं वाटतं."

अशोक म्हणाला, "एवढ्या मिरमुटल्या माणसांनी पृथ्वीवर केवढा प्रलय करून सोडला." यावर सदाशिवराव म्हणाले,

अरे त्यांच्या आकारावर जाऊ नको. त्यांचा मेंदू फार तल्लख दिसतो. ज्या अवयवांचा माणसं जास्त उपयोग करतात, तो वाढत वाढत खूप मोठा होतो. यांनी पिढ्यान् पिढ्या डोक्यानेच काम केलेलं दिसतं. आपल्या पृथ्वीवरल्या माणसांचं असंच होणार आहे बरं का! कारण आपणही अलीकडे मेंदूचेच काम जास्त करू



लागलो आहोत." रमाकांत त्या माणसांच्या हातातले भाले न्याहाळत होता. तो एकदम म्हणाला, "अण्णा, त्यांच्या भाल्याचे फाळ सोन्याचे दिसतात." सदाशिवरावांना तीच शंका आली होती.

मंगळावर लोखंड सापडत नाही. पण सोने मात्र विपुल मिळते या तर्काला बळकटी आली.

नंतर त्यातले ४-५ जण जरा पुढे आले. प्रत्येकाच्या हातात एक-एक सोनेरी बेडी होती. आपल्या मित्रमंडळींपैकी एकेकाला पकडून बटुमूर्ती त्यांना शृंखलाबद्ध करू लागली. अशोकने त्या शिपायाचा हात झटकला. तो त्यांच्या अंगावर धावून जाणार तोच सदाशिवरावांनी त्याला आवरले. ते म्हणाले, " अशोक सध्या आपले प्राण त्यांच्या ताब्यात आहेत. आपण दंगामस्ती करता कामा नये." पण अशोक भडकलाच होता. त्याला आवरण्यास सदाशिव-रावांना खूप कष्ट पडले. अखेर हातबेडी घालून घेण्यास तो तयार झाला. हरिहर बिचारा मुळातच भित्रा, तो गळे काढून रडू लागला. "हे लोक आता आपणाला ठार करणार." असं तो रडत रडत म्हणाला. मग रमाकांतने थोड्या बेफिकीरीने म्हटले, "अरे केव्हा-तरी मरायचेच आहे ना. मग आज मेले तर बिघडले कुठे? सदा-शिवराव त्याला म्हणाले, " हरिहर, अरे तुझ्या बेड्या पहा. कशा सुंदर सोन्याच्या आहेत !" आता हरिहरचे भय जरा कमी झाले. तो जितका भित्रा तितकाच लोभी होता. तो म्हणाला, " आप-णाला, कधीकाळी या माणसांनी सोडलं तर या साऱ्या बेड्या आपण घेऊन जाऊ. अहो पृथ्वीवर जन्माची ददात मिटेल." आपल्या या मित्रमंडळींना शृंखलाबद्ध केल्यावर ते शिपाई रांगेने उभे राहिले. आणि त्यांना बरोबर चलण्याची खूण केली.

पुढे सर्वांचे आवडते अण्णा. त्याच्यामागे त्यांचा पट्टशिष्य अभिराम, नंतर अशोक, रमाकांत आणि हरिहर या मित्रमंडळींना घेऊन शिपाई खोलीतून बाहेर आले. आता विमानातील एका लांबच लांब रस्त्यावर मंडळी आली होती. दोन्ही बाजूला

केबिनसारख्या खोल्या होत्या. प्रत्येक खोलीवर काळा पडदा सोडलेला होता. हे सर्व पहात आपली मंडळी चालली आहेत तोच शिपायांचा म्होरक्या पुढे आला. त्याने आपली सोनेरी तलवार वर उचलली आणि चित्कार केला. तो काहीतरी लष्करी आदेश असावा. सर्वांनी आपणाला थांबण्याचा इषारा मिळालेला आहे असे ओळखले, आणि ते स्तब्ध उभे राहिले. मग हाच म्होरक्या एका खोलीजवळ गेला. पडदा बाजूला करून त्याने दार ठोठावले. काही खुणांचा शब्द उच्चारला. तो ऐकून एक बटुमूर्ती मोठ्या ऐटीने पावले टाकीत बाहेर आली. त्यावेळी सर्व शिपायांनी या प्राण्याला लवून मुजरा केला. या नव्या माणसाची अंगलट इतर शिपायांसारखी होती. पण पोषाख भारी होता. त्याची टोपी पाहून एक तांबडे फनेल उलटीकडून त्याच्या डोक्यावर ठेवले आहे असे वाटले. हिरव्या रंगाचा पायघोळ झगा त्याने अंगावर चढविला होता. आणि गळ्यात एक रत्नहार घातला होता.

आपल्या मित्रमंडळींनी ताडले की, येथला हा मुख्य अधिकारी असावा. आता आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याचा विचार करीत जो तो पुढे काय होते आहे हे पाहू लागला. तो अधिकारी आपल्या इतर अनुचरांशी बोलत होता. त्याने त्याला काय सांगितले हे अर्थातच आपल्या मंडळींना कळले नाही पण सदाशिवराव याही आणिबाणीच्या वेळी संशोधनाच्या दृष्टीनेच पहात होते. त्यांच्या लक्षात आले की या माणसांच्या भाषेत तेच वर्ण पुन्हा पुन्हा येतात. यावरून मंगळावरच्या भाषेत वर्णसंख्या अगदी कमी असावी असा तर्क त्यांनी बांधला. ती त्यांना चिनी भाषेसारखी भाषा वाटली. कारण भाषेत अनुनासिकांची रेलचेल होती.

यम् टम् वम् असे काहीतरी शब्द कानावर येत. इतक्यात आपल्या या कैद्यांना आपल्या मागून चलण्याची नायक साहेबांनी खूण केली. आता कुठे नेतात? कुणाला ठाऊक .. जो तो विचार करू लागला. काही पावले पुढे टाकतात तोच माकडांचा चित्कार त्यांच्या कानी आला. कुणीसे म्हणाले, " मंगळावर माकडेही आहेत तर? पण ती विमानात कशाला ? " हे काहीच कळेना. सदाशिवरावांनी आपल्या बाजूस डोकावून पाहिले तोच विश्रामगावचा वटवृक्ष तेथे होता. " अरे, अशोक, अभिराम पाहिलंस का ... हा तो नाहीसा झालेला वटवृक्ष. या लोकांनी मातीमध्ये पुरून ठेवला आहे आणि ही त्यावरली माकडे. " सदाशिवराव म्हणाले.

रमाकांत म्हणाला, " आपल्याला पाहून कोण आनंद झाला आहे त्यांना ! अण्णा, त्यांच्या चेहऱ्यावर असा काही भाव दिसतो आहे की, ती आता बोलतील असे वाटते. " सदाशिवराव हसून म्हणाले, " अरे बाबा हे आपले पूर्वज आहेत ना! आज किती दिवसांनी ते आपल्या वंशजांना पाहत आहेत. गावचे माणूस भेटल्याने आपल्याला जसा आनंद होतो तसा त्यांना झाला आहे. " अभिराम म्हणाला, " वा काय नाचत आहेत. बागडत आहेत. अरेरे ! त्यांना द्यायला आपल्याजवळ चणे-चुरमुरे देखील नाहीत."

तेवढ्यात अशोकची दृष्टी पलीकडे गेली. तेथे काचेच्या प्रचंड पात्रात पाणी होते. काही कमळेही दिसली. अगदी विश्रामगावला दिसली तशी. आत मासे इकडून तिकडे हिंडत होते. " म्हणजे विश्रामगावचे तळेही या ठिकाणी आहे तर, " अशोक म्हणाला.

अभिरामने विचारले, "पण अण्णा, या साऱ्या वस्तू हे लोक मंगळावर कशाकरिता नेत आहेत?" तेव्हाच सदाशिवराव

म्हणाले, "अरे माझा कयास आहे की, त्यांना या वस्तू प्रयोगशाळेमध्ये नेऊन संशोधन करावयाचे आहे." यावर अशोक तुच्छतेने म्हणाला, "ही माकडे काय संशोधन करणार? सदाशिवरावांनी त्याला खोडून काढले, "अशोक असे समजू नको. माणसाच्या आकारावर आणि रंगरूपावर त्याची बुद्धी थोडीच अवलंबून असते? एखाद्या शहराएवढे प्रचंड विमान तयार करून हे लोक पृथ्वीवर येतात यावरून विज्ञानात त्यांची प्रगती झालेली दिसते. त्यांच्यामागे काहीतरी योजना आहे." नंतर रमाकांत म्हणाला, "त्यांच्या तलवारी दिसतात. ही शस्त्रे जुन्याच तऱ्हेची आहेत. त्यावरून पिस्तूल किंवा बंदूक यांचा शोध त्यांना लागलेला नसावा." सदाशिवरावांनी त्याला पुष्टी दिली, "बरोबर आहे तुझा तर्क. तुमच्याजवळ भरलेली पिस्तूले आहेत ना ? ती नीट सुरक्षित ठेवा. योग्यवेळी आपण त्याचा उपयोग करू." अशोक म्हणाला, "खरं म्हणजे आता सुद्धा मी या बेड्या सहज तोडू शकेन. या सोन्याच्या साखळ्या असल्यातरी एकदाणीसारख्या नाजूक आहेत. तेव्हा सदाशिवराव हसून म्हणाले, "तुम्ही तरुणच आहात. पण मी सुद्धा या बेड्या सहज तोडून टाकीन. पण शक्तीचा उपयोग करायची वेळ अजून आली नाही." पण तशी वेळ लौकरच आली.

* *

# अकरा

शिपायांच्या नायकाने खूण केली. त्याबरोबर शिपायांनी धम् धम् अशी काहीतरी आरोळी ठोकली. नायकाने जवळ भिंतीवर लोंबणारी एक साखळी ओढली. त्याबरोबर भिंत बाजूला होऊन शेकडो बटुमूर्ती पुढे येऊन उभे राहिले. प्रत्येकाच्या हातात सोन्याचा फाळ लावलेला एक भाला होता.

सारें सज्ज होऊन उभे होते. हुकूमाची वाट पहात होते. सदाशिवराव सावधगिरीच्या स्वरात अशोकला म्हणाले, "अशोक, पहा किती माणसं आहेत. त्यांच्या संख्येपुढे आपला कसा निभाव लागणार? समजा, आपण पाचपंचवीस लोक मारले तरी काय होणार? आपण अगदी विचाराने काय करायचं ते केलं पाहिजे."

असे बोलणे होत आहे तोच शिपायांच्या म्होरक्याने एक साखळी ओढली. भिंत बाजूला झाली एक भेसूर दृष्य दिसले. कितीतरी माणसे बांधलेली होती. कुणी आडवी पडलेली, कुणी बसलेली, कुणी अवघडत उभी. सर्वांना साखळ्यांनी बांधून टाकले होते. सारे रडत भेकत होते. सारे केविलवाणे दिसत होते.

अशोक संतापाने म्हणाला, "ह्या नीच बुटबैंगणांनी किती

अभागी प्राण्यांना बंदिवान करून ठेवलं आहे." सदाशिवरावांनी दुःखाने निःश्वास सोडला.

हरिहर कपाळावर हात मारून म्हणाला, "अरे माझ्या देवा, हे लोक आमची अशी दशा करणार की काय ?"

अशोक संतापाने कापत होता. हरिहरला भीतीने कापरे भरले होते. इतक्यात म्होरक्याने खूण करताच काही शिपाई पुढे सरकले.


रमाकांत, अशोक यांच्या हातातली पिस्तुले हिसकावून घेऊ लागले. अशोक ओरडला– "रमाकांत पिस्तूल सोडू नको. संरक्षणाचं एकच हत्यार आहे हे आपल्याजवळ. ते गेलं तर आपण निराधार होऊ." हिसकाहिसकी सुरू झाली. सदाशिवराव प्रतिकार करायला फारसे उत्सुक नव्हते. पण अशोक आणि रमाकांत हरणारे नव्हते. दोघांनी लाथ मारून दोनचार शिपायांना जमिनीवर पाडले. हे पाहून तो निमुळत्या टोपीचा नायक भडकला. एकदम ओरडला, "भम् भम् भमका." तो हुकूम होता. तो ऐकून बर्चीधारी वटुमूर्ती अशोक आणि रमाकांत त्यांच्यावर तुटून पडले. अशोक "मारू किंवा मरू" अशा त्वेषाने लढत होता गुद्दे लगावून, लाथा झाडून कित्येकांच्या डोक्याला ढुसणी देऊन तो वटुमूर्तींना हटवीत होता.

रमाकांतने त्याला उत्तम साथ दिली. हरिहर मूळचा भित्रा. पण म्हणतात ना, "दिव्याने दिवा लागतो." तसा शूराच्या सान्निध्याने भित्रासुद्धा शूर होतो. हरिहरला त्वेष चढला. हरिहरने उंच आवाजात म्हटले, "रमाकांत–अशोक लढा या बुट्ट्यांशी. मीही येतो लढायला. तुम्हाला मी एकटे मरू देणार नाही. अगोदर मी जाईन. मग तुम्ही."

"मध्ये येऊ नकोस." अशोक ओरडला आणि बर्चीबहाद्दर बटूवर नेम धरून त्याने पिस्तूल झाडले. शस्त्रधारी बटू धाडकन् खाली कोसळला.

पिस्तुलाचा प्रभाव विचाऱ्यांच्या ध्यानिमनी नव्हता. सारे शिपाई गर्भगळित झाले. शिपायांचा नायक मात्र आतून संतापलेला पण बाहेर थंड दिसला. तेवढ्यात अशोकने आणखी चार लोक यमसदनास पाठवले. नायक पूर्वीप्रमाणेच ओरडला, "भम् भम् भमका."

आता अशोकचे पिस्तूल रिकामे झाले होते. थोडा वेळ तो गांगरला. आपण पाच बळी घेतले. त्याचा हा बटुनेता सूड घेणार



हे त्याला कळून चुकले. पण तेवढ्यात अभिरामने त्याला अचूक कुमक दिली. त्याने नेम धरून त्या नायकावर गोळी झाडली. आणि जोराच्या वाऱ्याने एखादे भिताड कोसळावे त्याप्रमाणे तो

जमिनीवर पडला. त्याची फनेलसारखी टोपी एकीकडे आणि तलवार दुसरीकडे अशी स्थिती झाली.

आता मात्र सारे वामनमूर्ती घाबरले. सैरावैरा पळत सुटले. वाट मिळेल तिकडे प्रत्येकजण धावत होता.

इतक्यात सूं सूं सूं सूं...सण्...सण् असा आवाज ऐकू येऊ लागला. जणू राक्षसांच्या किंकाळ्याच. वाटले दहाबारा एंजिने जोराने शिट्ट्या मारताहेत. शिट्ट्या थांबेनात. हा प्रकार तरी काय असावा कुणाच्या लक्षात येईना.

शिपाई खूप संकटात सापडले एवढेच दिसत होतें. कुणी मागे वळून पहायला धजत नव्हता. त्यांची भाषा आपल्या मित्रांना कळत नव्हती. आणि भाषेचे दळणवळण शक्य असते तरी शिपाई काही सांगण्याच्या अवस्थेत थोडेच होते.

पण सदाशिवरावांनी बरोबर हेरले. ते म्हणाले, "अशोक, अभिराम तुम्ही केलेल्या गोळीबारातली एखादी गोळी विमानाच्या फुग्याला लागून तो फुटला असावा."

"पण एवढ्या विमानाचा फुगा, केवढा प्रचंड. तो साध्या गोळीने कसा फुटणार?"

"अरे मोठ्या यंत्रांनासुद्धा नाजूक मर्मस्थानं असतात. म्हणतात ना एवढा मोठा हत्ती, मुंगी कानात शिरली तर मरतो. त्याचं तात्पर्य हेच घ्यायचं. मोठमोठ्या पदार्थांचा भार विमानाला सहन करता आला पण गोळीनं त्याला जायबंदी केलं."

"अण्णा, आता हे बटुमूर्ती आपला चांगलाच सूड घेतील. त्यांच्या सेनापतीला ठार केलं ना आपण."

"तें आपला जीव घेतील. बघू काय होतंय ते. अगोदर

आपण या बंदिवान बांधवांना मुक्त करू. म्हणजे आपलं संख्याबळ वाढेल. आलेच हे बटुमूर्ती चाल करून तर आपण इतकेजण मिळून जास्त जोराचा तडाखा त्यांना देऊ"

सदाशिवराव आणि आपले मित्र यांनी मग त्या बंदीवानांना मुक्त केले. सर्वांना आनंद झाला. मुक्त झालेले बंदी आपल्या मित्रांना कडकडून भेटले. कृतज्ञतेनें अश्रू ढाळू लागले. पण या भावनावेगात सापडायला अवसरच नव्हता. पुढे काय ? हे प्रश्नचिन्ह प्रत्येकापुढे होते.

* *

## बारा

बंदिवान लोकात पांढरपेशा जातीचे लोक मुळीच नव्हतें. कामकरी, आदिवासी जातीचाच भरणा विशेष होता. विश्रामगावातून जी नौका हरवली होतीं, तिच्यातले हे उतारू होते. सदाशिवराव व त्यांचे मित्र यांनी त्यांच्या बेड्या तोडून त्यांना मुक्त केले. तेंव्हा त्या लोकांनी कृतज्ञतापूर्वक सर्वांचे आभार मानलें आणि त्यांच्या नावाचा जयघोष केला. तेव्हा सदाशिवराव त्यांना म्हणाले, "थांबा, पहा, हा जयघोष करण्याचा प्रसंग नाही. आपण सर्व एका मोठ्या संकटात सापडलो आहोत. आता आपण सर्वांनी एका विचाराने वागले पाहिजे. मी सांगेन तसे करण्यास तुम्ही तयार आहा ना ?"

यावर ते सर्व लोक म्हणाले," होय महाराज, आम्ही आपली आज्ञा अक्षरशः पाळू."

नंतर सदाशिवराव म्हणाले, "आपण आज ज्यांच्या ताब्यात आहोत तेच आपले शत्रू आहेत. त्यांनी आपणास खायला प्यायला द्यायचें बंद केले तर आपले प्राण जगावयाचे नाहीत. म्हणून अगोदर अन्नपाण्याची व्यवस्था करून प्राण जगवणे हे आपले पहिले कर्तव्य आहे."

"पण ती कशी करावयाची?" अशोकने विचारले.

"असे पहा, हे बटुमूर्ती आमच्या पिस्तुलांच्या प्रभावाने घाबरून दूर गेले आहेत. चांगलीच दहशत बसली असल्या कारणाने आता ते पुन्हा आपल्या अंगावर चालून येण्याचा प्रयत्न करणार नाहीत, पण ते आपल्याकडे आले नाहीत तरी आपण त्यांच्याकडे गेले पाहिजे. 'महंमदाकडे पर्वत आला नाही तर महंमदाने पर्वताकडे गेले पाहिजे.' ही म्हण तुला ठाऊक आहे ना? आपण या बटुमूर्तीकडे जाऊ. त्यांनी बऱ्या बोलाने खायला दिलें तर ठीकच; नाहीतर आपण त्यांच्याशी युद्ध करू."

इतकें बोलून सदाशिवराव जाऊ लागले. सर्वांच्यापुढे सदाशिवराव, त्यांच्या पाठोपाठ अशोक, अभिराम व बाकीचे लोक जाऊ लागले.

बटू शिपायांचे सैन्य एका बाजूला जाऊन उभे राहिले होते. हे पृथ्वीवरील लोक काय काय करीत आहेत हे ते मोठ्या उत्कंठेने आणि अर्धवट भीतीने पहात होते. इतक्यात सदाशिवराव बाकीच्या मंडळींना सोडून पुढे गेले आणि तोंडावर व पोटावर हात ठेवून त्यांनी आपणाला भूक लागली असल्याची खूण केली.

बटू शिपायांची आपापसात चर्चा सुरू झाली. काही वेळाने

त्यांच्यातला एक मनुष्य पुढे आला आणि तुम्हाला खाद्यपेय पदार्थ आणून देतो. असे खुणेने त्याने सांगितले.

सदाशिवराव आनंदित होऊन म्हणाले, " मंगळावरील लोक आपणाला खात्रीने भ्याले आहेत. त्यांच्याशी आपण आता समेट करण्याचा प्रयत्न करू. त्याला फारसा उशीर लागणार नाही. कारण, शक्तीचा महिमाच असा आहे ! चला, आता आपण आपल्या वटवृक्षाखाली जाऊन बसू या. तोवर आपले जेवणाचे होईल."

असे म्हणून सदाशिवराव सर्व मंडळीला घेऊन वटवृक्षाकडे गेले. तेथल्या माकडांना ओळखीचे चेहरे दिसल्याबरोबर त्यांनी ' किच् किच् ' असा आनंदसूचक ध्वनी केला.

वटवृक्षाकडे जाता जाता सदाशिवराव मध्येच एके ठिकाणी उभे राहिले. आणि विमानाच्या पारदर्शक आवरणातून एकदा खाली व एकदा वर पाहून ते म्हणाले, "अशोक, हे पहा. खाली तुला काय दिसते आहे ?"

"काही नाही. नुसते शून्य आकाश !"

" याचा अर्थ असा की आपण पृथ्वीपासून इतके दूर आलो की ती आता दिसेनाशी झाली."

अशोकनें नीट पाहून म्हटले, "वर देखील सर्व शून्याकार आहे. नाही म्हणायला एक तेजस्वी लाल रंगाचा मोठा तारा दिसत आहे!"

सदाशिवराव म्हणालें, "अरे हाच तो मंगळग्रह. युरोपियन पुराणात याला युद्धाची देवता मानतात. मंगळग्रह आकाराने फार लहान आहे. पृथ्वीच्या एक चतुर्थांशाहून तो थोडा मोठा आहे. त्याचा सारा व्यास साडेचार हजार मैल आहे !"

त्या अनंत आकाशात एखाद्या क्रुद्ध राक्षसाच्या भयंकर डोळ्यांप्रमाणे तो लाल मंगळग्रह चमकत होता. ते दृश्य पाहून भीती, आश्चर्य इ. ना प्रकारच्या भावनांचे काहूर सर्वांच्या मनात उठले.

* *

# तेरा

[या पुढील मजकूर सदाशिवरावांच्या रोजनिशीतला आहे.]

" किती दिवस झाले हे बरोबर कळायला काही मार्ग नाही. त्याची गणती मी केली नाही. पण थोड्या दिवसापूर्वी मंगळावरील हे विमान आकाशाच्या पोकळीतून जात होते, ते एका मिनटात किती मैल जात होते ते कळण्याला काही साधन नव्हते. पण पृथ्वीवरील विमानापेक्षा त्याचा वेग पुष्कळच जास्त असावा हे खास. कारण, डोक्यावर दिसत असलेला मंगळाचा तारा हळुहळू मोठा दिसू लागला होता. त्यावरून विमान मंगळाकडे आलेले होते. याबद्दल शंका नव्हती.

बटुमूर्तींनी यानंतर आम्हाला विशेष त्रास दिला नाही. दररोज त्यांनी खाण्याचे पदार्थ आमच्यापुढे आणून ठेवावे आणि आम्हीही बटुमूर्तींशी सरळपणाने वागावे. आमच्याजवळ येण्यास ते भीत. पिस्तुलाच्या शक्तिमुळे ते चांगलेच नरम आलेले दिसत होते. ते आमच्यावर पहारा करीत; परंतु ते पूर्वीप्रमाणे समोर उभे रहात नसत. दूर लपून बसून आमच्यावर नजर ठेवीत.

पृथ्वीवरल्या वातावरणातून त्यांनी जो जलदीने पाय काढला त्याचे कारण आमचे बंड होय. आमच्या पिस्तुलाच्या गोळीने त्यांच्या विमानास छिद्र केल्याने ते घाबरले. त्यानंतर आम्हाला त्यांचेकडून कसलाही त्रास झाला नाही. ते आज भीती-मुळे गप्प राहिले आहेत खरे; पण मंगळावर त्यांचे आमच्याशी कसे काय वर्तन घडेल तें परमेश्वर जाणे !

आता आपणाला या जन्मी तरी पृथ्वीवर परत जाता येणे शक्य नाही. म्हणून मीही रोजनिशी लिहिण्यास सुरवात केली आहे. आमच्या जीवनक्रमात आमच्यावर कसकसे प्रसंग येऊन गेलें त्याचा इतिहास लिहिलेला असणे अगत्याचे आहे. म्हणून मी सर्व घडलेल्या गोष्टी लिहून ठेवू लागलो. न जाणो, पुढे मागे आमच्या-पैकी एखादा दैवगतीने परत पृथ्वीवर गेलाच, तर मी लिहून ठेविलेला हा इतिहास पृथ्वीवरच्या लोकांना फार उपयुक्त होईल.

परंतु अशा संकटमग्न अवस्थेत देखील मला आनंद होत आहे. ज्या मंगळग्रहाविषयी शोध करण्यात मी आयुष्याची वीस वर्षे घालविली व ज्याच्याविषयी पृथ्वीवरच्या लोकात नाना-तऱ्हेचे तर्कवितर्क आणि चर्चा चालली आहे, नाना प्रकारच्या शंका निघत आहेत, आणि कल्पनांचा बाजार भरला आहे, त्या मंगळग्रहावर संचार करण्याची संधी मला मिळणार हे माझे केवढे भाग्य म्हटले पाहिजे!

ज्या ग्रहावर आम्ही जाणार होतो त्या ग्रहाची माहिती मला पूर्ण होती. त्यामुळे आम्ही लौकरच तेथे जाणार या विचाराने मला भीती वाटली नाही. पण अशोक, अभिराम व रमाकांत फार घाबरलेले दिसले. हरिहरची स्थिती तर विचारूच नका.

तो जडभरतासारखा कोणाशी एक शब्द न बोलता दुःखीकष्टी होऊन कोपऱ्यात बसून रहात असे.

माझ्या मित्रांना धीर देण्यासाठी एकदा त्यांना म्हटले, "तुम्ही असे घाबरता का? सांगा पाहू? तुम्हाला विशेष घाबरण्यासारखे काय आहे?"

अशोक तत्काळ म्हणाला, "हे पहा, 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.' आमच्यासारखे विपत्तीत पडल्यावर अगदी खुळा असेल त्याचीच आनंदवृत्ती राहील. पाण्यातून बाहेर काढलेल्या माशाला कधी आनंद वाटला आहे काय? पृथ्वी सोडून अनंत योजने लांब असलेल्या या ग्रहावर आम्हाला हे घेऊन जात आहेत. पण कुठे, काय, आणि पुढे आमचे काय होणार ते काहीच कळत नाही!"

तेव्हा मी त्याची समजूत करीत म्हणालो, "मंगळग्रहावर आपण जात आहो हे मागेच नाही का मी तुम्हाला सांगितले? आपल्यासारखी तिथेही माणसे आहेत. मग तुम्हाला भिण्याचे कारण काय? मंगळावर सगळे काही पृथ्वीच्या सारखेच आहे. तेथे हवा आहे. या गोष्टीला हवी तितकी प्रमाणे देता येतील. तेथे धुके आहे, मेघ आहेत, जीव आहेत आणि त्यांना जगण्याला आवश्यक अशा सगळ्या गोष्टी आहेत. अर्थात पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखी आपली स्थिती होईल ही भीती व्यर्थ आहे ही खात्री ठेवा."

"पण मंगळाचा रंग तांबडा का?"

मी म्हटले, "मंगळ ग्रहाचा तीनपंचमांश भाग वालुकामय आहे त्याठिकाणी पाणी, फळे, धान्य वगैरे काही होत नाही. नुसती रसरशीत तापलेली तांबडी लाल वाळू आहे. त्यामुळे मंगळाचा रंग तांबडा आहे."

आणखी काही दिवस निघून गेले.

आता आमच्या विमानावर पृथ्वीचे आकर्षण नाही. आता मंगळग्रहाचे आकर्षण सुरू झाले आहे. मंगळ आकाराने मोठा दिसू लागला आहे. आता मंगळाला पहावयाचे म्हणजे मान वर करायला नको. खाली पहावे लागते.

एके दिवशी रात्री आम्हाला एक चमत्कार दिसला. आकाशात दूर अंतरावर पृथ्वी चंद्राप्रमाणे उज्ज्वल दिसली. रात्री आपल्या लहानग्याला वक्षःस्थलावर घेऊन माता ज्याप्रमाणे प्रेमार्द्र दृष्टीने त्याच्याकडे पहात बसते, त्याप्रमाणे ही पृथ्वीमाता आमच्याकडे पहात आहे असा भास होत होता. मी सर्वांना बोलावून हाच चमत्कार दाखविला. कित्येकांनी भक्तिभावाने तिला नमस्कार केला. कित्येक अश्रू ढाळू लागले. माझ्याही मनात कालवाकालव चालली होती. हाय ! मातेच्या अंकावर बसण्याचे भाग्य पुनः आपणास कधी काळी मिळणार आहे की तिच्या प्रेमास आपण कायमचे अंतरलो हा विचार मनात येऊन मला अतिशय दुःख झाले.''

* *

# चौदा

"हा मंगळग्रह–! पूर्वीपेक्षा जवळ, तरी अद्यापि पुष्कळच दूर आहे. वामनमूर्ती लोक आम्हाला त्रास देत नाहीत. त्यांच्याशी लगट करून गेलो म्हणजे ते झटकन् आपल्या खोलीत जाऊन आतून दारे लावून घेतात. आमच्या हालचालीवर नजर ठेवण्यासाठी चारी दिशांना पण दूर दूर हत्यारबंद पाहरेकरी ठेवले आहेत.

एके दिवशी अशोकने एका बटुमूर्तीला धरले होते. पण धरल्याबरोबर त्या बटूने ओरडून एकच कल्लोळ केला. भीतीने तो बेशुद्ध होऊन पडला, तेव्हा त्याला सोडून देणे अशोकला प्राप्तच झाले.

आज आमची सभा झाली. अभिराम, अशोक, रमाकांत, हरिहर व दुसरे बंदिवान या सर्वांना मी एकत्र बोलाविले आणि म्हटले, "हे पहा, आता आपण लौकरच मंगळ ग्रहावर जाणार आहोत. वामनमूर्ती भीतीमुळे आता काही बोलत नाहीत, पण स्वदेशी गेल्यावर ते लोक आपणाशी कशी वागणूक ठेवतील ते सांगता येत नाही. त्या ठिकाणी सर्व लोक त्यांचेच असणार. त्यांची संख्या मोठी असल्यामुळे नुसत्या एक दोन बंदुकीचे भय दाखवून त्यांना फार दिवस धाकात ठेवता येणार नाही. म्हणून आपण

पदोपदी सावधानता ठेवली पाहिजे. त्या ठिकाणी गेल्यावर आपण एकोप्याने राहिले पाहिजे. आपण सर्वांनी खाणे, पिणे, उठणे, बसणे हे एकत्र राहूनच केले पाहिजे. जे काही करावयाचे ते सर्वांच्या विचारानेच केले पाहिजे. असे केले तरच आपणाला आपलें संरक्षण करता येईल."

आणखी काही दिवस गेले.

आता मंगळग्रह अगदी जवळ आला आहे. तो आम्हाला एखाद्या प्रचंड थाळीसारखा दिसू लागला आहे. आता मंगळावर पोचायला एका दिवसापेक्षा जास्त वेळ लागावयाचा नाही असे दिसते.

आज सकाळी उठून पाहिलें तो मंगळावर खूप मेघ व धुके जमलेले दिसले. मधून मधून मेघांचे, आवरण बाजूला सरून लाल, हिरवा, पांढरा अशा रंगाची शोभा दिसत आहे. लाल रंग मंगळा-वरील वालुकामय प्रदेशाचा असून हिरवा रंग मंगळावरील शेते व अरण्ये यांचा आणि पांढऱ्या वाळूच्या कणांचा आहे.

मंगळग्रह पृथ्वीपेक्षा फार जुना आहे. त्यावरील नद्या व समुद्र आता सुकून गेले आहेत. पृथ्वीचीही एके काळी अशीच दशा होईल असे शास्त्रज्ञ सांगतात. पाणी नसल्यामुळे मंगळावरील लोकांना जीव बचावणे कठीण झाले आहे. सृष्टीतल्या पहिल्या जीवाची उत्पत्ती पाण्यापासूनच झाली होती. अर्थात मंगळावरच्या लोकांनी स्वसंरक्षणासाठी मोठमोठे कालवे काढून आणि मंगळाच्या ध्रुव प्रदेशातल्या बर्फाच्या वितळण्याने झालेले पाणी साठवून त्यावर शेतीवाडी करण्याची तजवीज केली आहे. असे कालवे एक नाहीत, दोन नाहीत, असंख्य आहेत.

पृथ्वीसारखा मंगळही सूर्याभोवती प्रदक्षिणा करतो. त्याला

एक प्रदक्षिणा करण्यास पृथ्वीच्या जवळ जवळ दुप्पट म्हणजे ६८७ दिवस लागतात. अर्थात आमची जवळ जवळ दोन वर्षे म्हणजे त्याचे एक वर्ष होते. यावरून हे उघड दिसते कीं, दोन वर्षांनी एकदा मंगळ फिरत फिरत पृथ्वीच्या नजीक येतो. त्यावेळी तो सहा महिनेपर्यंत पृथ्वीच्या निकट असतो. नंतर भ्रमण करीत हजारो कोस दूर जाऊन सूर्याच्या आड दिसेनासा होतो. मंगळावरील दिवस पृथ्वीवरील दिवसापेक्षा सुमारे ३७ मिनिटांनी मोठा असतो.

काल अशोक, रमाकांत आणि अभिराम एक चमत्कार पाहून फार आश्चर्यचकित झाले. तो चमत्कार असा की, मंगळाला दोन उपग्रह अथवा चंद्र आहेत. एकाचे नाव 'फोबोस' असे आहे. तो मंगळाच्या मध्यबिंदूपासून ५८०० मैल आहे. सात तास एकोणचाळीस मिनिटांनी तो एकदा मंगळाला फेरी घालतो. म्हणजे एका दिवसात त्याच्या तीन प्रदक्षिणा होतात. तो मंगळाच्या पूर्वेला उगवत नाही पश्चिमेला उगवतो. आणि चार तासांनी पश्चिमेला मावळतो. तेंवढ्या अल्पकाळात चंद्राप्रमाणे त्याच्या कालाची क्षयवृद्धी पूर्ण होते म्हणजे तेवढ्या वेळात तो वाढत वाढत पूर्ण झालेला दिसतो आणि नंतर कमी कमी होत दिसेनासा होतो. अर्थात आपल्या चंद्राची पौर्णिमेपासून अमावास्येपर्यंतची सर्व स्थित्यंतरे मंगळाच्या चंद्राला सातच तासात अनुभवायला मिळतात. मंगळाभोवती 'डेमॉस' नावाचा दुसरा एक चंद्र असून तो मध्यबिंदूपासून १४६०० मैल आहे. हा ३० तास १८ मिनिटे इतक्या कालावधीत मंगळाभोवती एक फेरी घालतो तीन दिवसांच्या अंतराने त्याचे उदय व अस्त होतात. आणि तेवढ्या अवधीत त्याची वृद्धी, पूर्णता, क्षय व अस्तही होतात. हा

पूर्वेला उगवतो.

आपल्या चंद्रापेक्षा हे दोन्ही चंद्र आकाराने फारच लहान आहेत. डेमॉसपेक्षा फोबोसचा आकार मोठा आहे. फोबोसचा व्यास ७ मैलाचा तर डेमॉसचा पाच किंवा सहा मैलांचा आहे. हे दोन्हीं चंद्र उगवले तर मंगळावर रात्री फारसा प्रकाश पडत नाही. कारण, आपल्या पूर्ण चंद्राच्या एकसाठांश फोबोसचा प्रकाश असतो आणि एकबाराशेवा अंश डेमॉसचा प्रकाश असतो.

मंगळावरील मेघांच्या जाळ्यातून पार गेल्यावर पुनः आम्ही खाली उतरलो. या ठिकाणी आम्हाला एक कल्पनातीत दृश्य पहावयाला सापडले. सर्व प्रदेश तापून गेलेल्या वाळूने व्याप्त असून ते तप्त झालेले वाळवंट अमर्याद होते. त्यातून असंख्य कालवे काढलेले होते! काही कालवे आडवे गेलेले, तर काही उभे गेलेले; आणि काही समांतर काढलेले होते. काही तर तीनचार हजार मैल लांबीचे असावेत! एवढे विस्तीर्ण कालवे खोदण्याला किती परिश्रम पडले असतील याची कल्पनाच केली पाहिजे! हे कालवे खणून काढणाऱ्या वामनमूर्तींच्या बुद्धीचे व सामर्थ्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच!

जेथे ते कालवे काढले होते, त्याच्या दोन्ही बाजूला गर्द शेते व वने दिसत होती. विमान खाली उतरल्यावर अधिक निरखून पाहता आम्हाला अनेक लहान मोठी घरे दिसली. त्यावरून ते शहर असावे अशी खात्री झाली. मध्ये मध्ये पहाडही दिसत होते.

थोडक्याच वेळात आमचे विमान एका मोठ्या शहराजवळ येऊन हळुहळू खाली उतरू लागले. खाली शेकडो लोक जमले असून घण् घण् घण् असा घंटानाद व भेरीचा दुम् दुम् दुम् असा गंभीर ध्वनी आम्हाला ऐकू आला. लोकही गर्जना करीत होते.

आम्ही पाहिले तो, लोक घरांच्या गच्चीवरून, रस्त्यातून आणि झाडावरून गंमत पहाण्यासाठी उभे होते. इतक्यात एकाएकी २०–२५ लहान लहान विमानें आमच्या विमानाच्या रोखाने येताना दिसली. ही विमाने आम्हाला आमच्या बिऱ्हाडी नेण्याकरिता आली असावीत असे आम्हाला वाटले.

मी म्हटले, " अशोक, आता सर्वजण तयार रहा. आपणाला येथेच उतरावे लागणार असे दिसते."

अशोकने पिस्तूल नीट घासून पुसून व खिशात ठेवून उत्तर दिले, "हो, हो, मी तयारच आहे."

● ● ●

[मंगळाच्या सफरीची माहिती अधिक चित्ताकर्षक व्हावी म्हणून सदाशिवरावांच्या डायरीतील उतारे जसेच्या तसे दिले आहेत. त्यातील बहुतेक गोष्टी सत्य मानायला पुष्कळच जागा आहे. यावर ज्यांचा विश्वास नसेल त्यांनी लॉवेल, ग्रीन, स्टॅन्ले वुइल्यम् इ. पाश्चात्य शास्त्रज्ञांचे ग्रंथ पहावे. —लेखक]

* *

# पंधरा

"अखेर एकदाचें आमचे विमान एका शहराजवळ उतरले. तो चारी बाजूंनी लहान लहान माणसे विमानाभोवती रांगेने गोळा झाली. त्यांचे तेजस्वी गोल डोळे आश्चर्य आणि आनंद यांनी युक्त दिसत होते. सर्वांच्या तोंडून 'ह चा हम्' असा जयघोष निघत होता.

विमानाच्या खोल्यांच्या भिंती बाजूस सारून त्यातून वामन शिपाई भराभर बाहेर पडू लागले. एक पलटण बर्चिवाल्या शिपायांची होती. तें बर्च्या वर करून दोन्ही बाजूस रांगेने उभे राहिले. कोणी आत घुसू नये म्हणून ते बंदोबस्त ठेवीत होते. विमानावरचा मुख्य अमलदार सर्वांच्या पुढे झाला. त्याला पहाताच बाहेरील लोकांतून झकपक पोषाख केलेले तिघेजण त्याच्या रोखाने आले आणि त्यांनी त्यांचे स्वागत केले.

आम्ही सर्व एकत्र उभे राहून वामनमूर्तींची सर्व कृती पाहत होतो. ती माणसे आमच्याकडे विस्मित नजरेने पाहून काही बोलत आहेत असे पाहून अशोक म्हणाला, "हे लोक आपणाविषयीच बोलत असले पाहिजेत."

मी म्हटले, "हो. तुझा तर्क बरोबर आहे. परंतु आपण न


घाबरता धैर्याने येईल त्या संकटास तोंड देण्याची तयारी केली पाहिजे. गंमत कशी पहा! कुठचे पाणी आणि कुठे जाऊन पोचले!"

इतक्यात विमानाच्या अंमलदाराने जोराने शिंग फुंकले. त्याबरोबर शहरातून तसाच आणखी एक आवाज ऐकू आला. आणि थोडक्या वेळात शेकडो वामन शिपाई टोळधाडीसारखे तेथे येऊन धडकले. रमाकांत घाबरून म्हणाला, "हे शिपाई आपणावर चाल करणार की काय?"

मी म्हणालो, "आपण जर त्यांच्या तंत्राने घेतलें तर ते काही आपणाला त्रास देणार नाहीत."

अशोक म्हणाला, "हे पहा, केवढे यंत्र त्यांच्याजवळ आहे ते! ही यांची तोफ तर नसेल?"

मी पाहिले तो ते एक घंटेसारखे यंत्र दिसले. त्याची उंची पन्नास साठ फूट असून रुंदी चांगली पंचवीस तीस फूट खास



असावी. ते यंत्र ओढून नेण्याकरिता काही विचित्र प्राणी त्या लोकांनी लाविले होते. ते काहीसे उंटासारखे पण त्यांच्यापेक्षा होते. लहान उंटापेक्षा एक गोष्ट मात्र त्याच्यात अधिक होती, ती ही की,

त्याच्या डोक्यावर एक भले मोठे शिंग होते! या प्राण्यांचा रंग अगदी काळा कुळकुळीत होता. हे मंगळावरील घोडे किंवा बैल असावेत असे आम्ही ताडले.

ते प्राणी हळुहळू ते यंत्र ओढीत आमच्या विमानाच्या रोखाने येऊ लागले.

विमानाच्या जवळ ते यंत्र आणून उभे केले. पाहिले तो त्या यंत्राला मोठाली चाके होती. त्याच्याजवळ एक वामनमूर्ती माणूस उभा होता. त्याने कळ दाबल्याबरोबर ते यंत्र उंच होऊन एका बाजूला अशा रीतीने कलले की, त्याचा पोकळ भाग विमानाच्या बाजूला झाला. माझ्या डोक्यात लागलीच एक शंका उभी राहिली. ज्या यंत्राने हे लोक पृथ्वीवरील वस्तू उचलून घेतात त्या यंत्रासारखेच हवेच्या दाबाचे हे यंत्र तर नसेल ना?

मी अशोकला म्हणालो, "तुझ्या बंदुकीची मात्रा आता मुळीच चालणार नाही."

"पण हे आणण्यांचा उद्देश काय?"

"सांगतो ऐक. आपण जर या लोकांच्या म्हणण्याप्रमाणे वागलो नाही तर आपणाला या यंत्राच्या शक्तीने शोषून घ्यावे असा यांचा उद्देश दिसतो. हे यंत्र पहा तर खरे. केवढे प्रचंड आहे ते ! यावर अशोक विषण्ण होऊन म्हणाला, "असे जर असेल तर आपण बटुमूर्तींच्या इच्छेप्रमाणे वागावे हे बरे ! तुम्हाला काय वाटते ?"

मी म्हणालो, "तुझेच म्हणणे बरोबर आहे. शिवाय त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागण्यात आपले तरी काय नुकसान आहे ?"

"पण त्यांनी जर आम्हाला कुत्र्यामांजराप्रमाणे बंदिवान करून ठेवले तर ?"

"तर त्याला काय करणार ?"

अशोक खिन्न होऊन स्तब्ध राहिला. इतक्यात एक बटू शिपाई आला आणि त्याने दुरूनच आम्हाला विमानातून उतरण्याची खूण केली. अशोक एखाद्या समजूतदार मुलाप्रमाणे विमानातून उतरण्याकरिता पुढे सरसावला. बाहेरच्या बाजूस सोन्याच्या बर्च्या घेतलेले हजारो शिपाई तयार होते. आमच्यापैकी एखाद्याने जर त्यांच्या हुकूमाचा अवमान करण्याचे ठरविले असते तर त्यांनी त्यांच्यावर चढाई केली असती.

विमानातून उतरण्याकरिता तीन फूट उंचीची एक शिडी विमानाला जोडलेली होती. अशोकाला काय वाटले कोणास ठाऊक ! शिडीवरून न उतरता त्याने एकदम उडी मारली. तो तो जमिनीपासून पंधरा हात वर उडाला आणि मग तीस हात अंतरावर खाली त्या वामनमूर्तींच्या टोळीत धपकन् पडला.

वामनमूर्तींना त्याचे फार आश्चर्य वाटले. ते आरोळी मारून अशोकाच्या पासून चटकन दूर झाले. त्यांनी साऱ्या जन्मात असा प्रकार कधी पाहिला नव्हता. त्यांची मती कुंठित झाली.

तीन फुटावरून उडी मारीत असलेला अशोक तीस फूट कसा उडाला याचा मला फार अचंबा वाटला ! अलौकिकच प्रकार म्हणावयाचा !

* *

# सोळा

थोड्या वेळाने आश्चर्याची लाट ओसरल्यावर एका गोष्टीचे मला स्मरण झाले. येथील गुरुत्वाकर्षण पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षणाच्या मानाने जवळ जवळ तृतीअंश आहे. पृथ्वीवर ज्या पदार्थाचें वजन शंभर शेर भरते, त्याच पदार्थाचे वजन मंगळावर अडतीस शेर भरते. मंगळावरील हवेचा दाबही पृथ्वीवरील दाबापेक्षा एक चतुर्थांश आहे.

अशोक जोराने उडी मारून जो वर उडाला, त्याचे हे कारण थोडक्यात जसे मला सांगता आले तसे मी आपल्या मंडळींना समजावून सांगितले.

बटू शिपायांची अशी समजूत झाली की, अशोक त्यांच्यावर चाल करून जाणार आहे. म्हणून त्यांच्यापैकी एक पलटण अशोकवर वेगाने चालून गेली आणि एक पलटण ते प्रचंड शोषकयंत्र आमच्याकडे आणू लागली.

अशोकने मोठी चूक केली असे आम्हाला वाटू लागले. जर का या भयंकर यंत्राने आम्हाला गिळून टाकले तर मग जिवंत सुटण्याची आशाच करायला नको, आणि जिवंत राहिलो तरी यांच्या बंदिखान्यात कुत्र्यामांजरासारखे दिवस काढावे लागणार हे निश्चित होते.

रमाकांतने आपले पिस्तूल हातात घेतले. मी म्हटले, "बाबारे, ठेव ते खाली. जर जीव वाचवायचा असेल तर आता आपणास पळाले पाहिजे."

"पण कोठे पळून जाणार?"

"बाहेर उडी मारावयाची?"

"पण हे बटू शिपाई आपल्या पाठोपाठ येतील ना? मघा अशोकने उडी मारली तेव्हा ते कसे आश्चर्यचकित झाले ते पाहिलेस ना? आता अधिक काही न बोलता अगोदर उडी मार."

इतके बोलून मी लागलीच उडी मारली. त्याबरोबर मी तीन ताड उडालो आणि चाळीस फूट दूर जाऊन पडलो. मला वाटले होते की, एवढी लांब व उंच उडी मारल्याने हातापायांच्या हाडांचा चुराडा होईल. परंतु तसे काही न होता मी धडपणे जमिनीवर उतरलो. शरिराला यत्किंचितही इजा झाली नाही. माझ्या मागोमाग माझे मित्रही बिनशेपटीच्या माकडाप्रमाणे उड्या मारून माझ्याजवळ येऊन पडले. आमच्याजवळ जे बटू शिपाई होते ते हा प्रकार पाहून भीतीने सूं बाल्या कोठेच्या कोठे पळून गेले.

आम्ही आणखी एक उडी मारली. आणि दूर जाऊन पडलो समोर पाहिले तो एक मोठा रुंद कालवा आम्हाला दिसला. त्यातले पाणी मंगळाच्या ध्रुवाजवळच्या बर्फाचे वाहात आलेले होते. पृथ्वीवर इतका रुंद कालवा उतरून पार जावयाचे झाले तर पोहतच जावयास पाहिजे. पण येथे एकेका उडीतच आम्ही तो ओलांडला, आणि लंकेला गेलेल्या हनुमानाप्रमाणे कालव्याच्या पलीकडे जाऊन पोचलो.

अशोक माझ्यापुढे भराभर उड्या मारीत चालला होता. आता आमच्यात आणि बटुमूर्तीत चांगले तीन मैलांचे अंतर पडले

होते. अशोकाने आता उड्या मारण्याचे बंद करून म्हटले, "आता आपण येथेच विसावा घेऊ. उड्या मारमारून फार दम लागला आहे."

पाठीमागे वळून मी पाहिले तो शत्रूचा मागमूसही नव्हता. आमचेच मित्र उड्या मारीत होते.

मी अशोकाला म्हणालो, "अशोक, ही थांबण्याची वेळ नाही. वटू शिपाई इतक्यात विमान घेऊन आले तर काय करावयाचे?"

अशोक विचारात पडला.

इतक्यात हरिहर म्हणाला, "जवळच पहा, तो एक पहाड दिसतो आहे, तेथे जाऊ. तेथे आपणाला लपायला भरपूर जागा मिळेल."

हरिहराचे म्हणणे आम्हाला पटले. आम्ही तात्काळ उड्या मारीत मारीत पहाडापाशी जाऊन पोहोचलो. हरिहर देखील कांगारूसारखा उड्या मारीत मारीत त्वरेने आला आणि झटकन् पहाडावरून चढून दिसेनासा झाला. नंतर पाच मिनिटांनी परत येऊन तो सांगू लागला की, "पहाडात एक गुहा आहे. तेथे आपणा सर्वांना पुरेल एवढी प्रशस्त जागा आहे."

इतक्यात आकाशातून एक प्रचंड ध्वनी येऊ लागला. मी वर पाहिले. तों विमाने दिसली. एक नाही दोन नाही, चांगली वीस पंचवीस विमाने होती. मी हरिहरला ओढून नेत म्हणालो, "चल, चल, गुहेकडे चल लौकर."

* *

# सतरा

पहाड फार उंच नव्हता. फार झालें तर दोनशे फूट असेल. पहाडावर झाडपाल्याचे नांव नव्हते. त्या काळ्या रुक्ष पहाडीतून वाकड्या तिकड्या उंच सखल पायवाटेने धडपडत व उड्या मारीत वर गेली. समोरच एक गुहा दिसली. तिचे तोंड लहान होते. परंतु आतला भाग मात्र चांगलाच विस्तृत होता. शंभर लोक हातपाय लांब करून बसतील एवढी विस्तीर्ण जागा त्या गुहेत होती.

सर्वजण गुहेत आल्यानंतर मीं म्हटलें, "आता आपण निर्धास्त झालो."

यावर अभिराम म्हणाला, "परंतु येथे खायची सोय काय करावयाची? खायला असल्यावाचून आपणाला जगता येणार कसे?"

मी म्हटले, "आधी आलेल्या विपत्तीतून सुटू या. मग खाण्यापिण्याच्या गोष्टी!"

विमानाचा शब्द खूप मोठ्याने अगदी जवळ ऐकू येऊ लागला. मी जरा बाहेर डोकावून पाहिले तो वीस विमानांपैकी बरीच विमाने दूर दूर गेली असून दोन मात्र अगदी पहाडावर घिरट्या घालीत असलेली दिसली. त्यांचा कर्कश शब्द होऊ लागला.

मी ओरडून म्हणालो, " हां, आता कोणी गुहेच्या बाहेर

जाऊ नका. वामनमूर्ती शोषक यंत्राने आपणाला ओढून नेतील."

इतक्यात थंड हवा लागू लागली. मी गुहेच्या तोंडाजवळून उठून आत आलो. हवेच्या माऱ्याने आम्ही सर्वजण कापू लागलो. आमच्या मागची ही साडेसाती कशी सुटेल ते आम्हाला कळेना. तो कर्कश शब्द अधिक मोठ्याने ऐकू येऊ लागला. गुहेतून आम्हाला असें दिसले की, पहाडावरील लहान मोठे दगड हवेत उंच उडत आहेत.

अशोक भयभीत होऊन म्हणाला, "पहा, आपण गुहेबाहेर असतो तर आपलीही अशीच अवस्था झाली असती."

एवढे बोलणे होत आहे तो एकाएकी शब्द थांबला. थंड हवा वहाण्याचेही बंद झाले. मी गुहेबाहेर डोकावून पाहू लागलो. तो दोन विमाने पहाडाच्या रोखानेच उतरत आहेत असे मला दिसले.

" अशोक, अशोक, विमाने आपल्याकडेच येत आहेत. आली आता फजितीची वेळ! "

माझे हे शब्द ऐकताच सर्वजण गुहेत अंग टाकून पडले होते ते खडबडून उठले.

अशोक क्षुब्ध होऊन म्हणाला, "येऊ दे त्यांना. मी झुंज करून प्राण देईन. पण या माणसांच्या हातात बंदिवान होऊन राहणार नाही."

सर्वजण लागलीच उद्गारले," हो, हो आमची देखील तशीच तयारी आहे."

मी शांत होऊन म्हणालो, "तुम्ही सर्वजण शांत होऊन माझी गोष्ट ऐका. उगीच आततायीपणाने मरण्यात काय अर्थ आहे? अशोक आणि रमाकांत या दोघांनी जर पिस्तुलं झाडली तर ही

दोन विमाने भंग पावतील असे तुम्हाला वाटते ना? ठीक आहे, करून पहा."

अशोक उत्साहाने म्हणाला, "ठीक आहे रमाकांत! चल, गुहेच्या बाहेर ये."

पण मी त्यांना अडवून म्हटले, "हे पहा, तुम्हीं गुहा सोडू नका. ते शोषक यंत्राने तुम्हाला ओढून नेतील."

मी निरखून पाहिले तो ती विमाने गोळीच्या टप्प्यात आली नव्हती. मी अशोकाकडे खूण केली आणि अजून गोळी सोडायला अवकाश आहे असे सांगितले. थोडया वेळाने तीं विमाने जवळ आली.

"झाड गोळी." असे अशोक रमाकांतास म्हणाला. दोघांनी बंदुका झाडल्या. नेम अगदी बरोबर लागला. विमानाच्या फुग्याला नेम लागून त्यातील हवा बाहेर येऊ लागली. त्याबरोबर वरून 'कूं' असा एंजिनच्या शिट्टीसारखा आवाज येऊ लागला.

मी आनंदाने म्हणालो, "शाबास रे शाबास! तुमच्या बहा-दुरीची तारीफ करावी तेवढी थोडीच! विमानाच्या निर्वात भागात हवा घुसल्याचा हा आवाज आहे."

अशोक आणि रमाकांत या दोघांनाही स्फुरण चढले. त्यांनी आणखीं एकदोन गोळ्या झाडल्या. विमानांची दिशा बदलली गेली. ती वेगाने पळून जाऊ लागली, आणि काही वेळाने नाहीशी झाली.

"गोळीबाराचा जय असो." अशी अशोकाने आनंदाने गर्जना केली.

* *

# अठरा

सूर्यास्त झाला. चोहीकडे तांबडीलाल वाळू आणि मध्ये लहानसा पहाड. मंगळावरील हवा पृथ्वीवरील हवेपेक्षा बरीच थंड म्हणून बरे. नाहीतर आमची फजितीचीच वेळ होती. इतके असूनही आम्हाला ताप होत होताच.

मंगळावरच्या वाळवंटाचे विशेषत्त्व हे की, या ठिकाणी पाण्याची पंचाईत मुळीच पडत नाही. कारण वाळवंटातून हवे तितके कालवे गेले आहेत. आमच्या पहाडापासून सुमारे अर्ध्या मैलावर एक कालवा होता. तहान लागली म्हणजे आम्ही त्या कालव्यावर जाऊन पाणी पीत असू. आमच्याजवळ पाणी ठेवण्याचे भांडे असते तर वरचेवर पाण्यासाठी इतके दूर जाण्याची यातायात पडली नसती. येवढे बरे की, येथे अर्धा मैल जाण्यास फारसा वेळ लागत नसे. लांब उड्या मारून सहज जाता येई.

कालव्याच्या काठी जंगल माजलेले दिसत होते आणि शेतेही रगड दिसत होती. परंतु तेथील झाडेझुडपे लहान खुरटलेली अशी दिसत होती. बहुधा तेथच्या मातीचा गुण असावा. एका जातीची झाडे मात्र तेथे खूप होती. ती खजुरीच्या झाडासारखी दिसत. हीच काय ती येथची सर्वात मोठी झाडे. जंगलात तीन-चार जातीचे पक्षी दिसत. पण पृथ्वीवरील कोणत्याच पक्ष्यासारखे

रंग अगर रूप नव्हते. एक पक्षी होता, त्याचे शरीर घारीसारखे खूप मोठे असून त्याचा रंग बैंगणी होता. त्याला चार पाय असून शेपूट पक्ष्यासारखे नसून माकडासारखे लांब होते. आणि त्याच्या शेवटाला केसांचा झुबका होता. हे चमत्कारिक चतुष्पाद पक्षी आम्हाला पाहताच उडून जात.

रात्र झाली. दोन चंद्र उगवले. परंतु त्या दोघांचा मिळून प्रकाश इतका मंद होता कीं, अंधार नाहीसा करायला त्यांचा काही उपयोग नव्हता.

आज आम्हाला सर्व दिवस उपास घडला. उद्याही काही खायला मिळेल अशी आशा दिसेना. आमची बहुतेक मंडळी थकून भागून झोपली. फक्त मी; अशोक, अभिराम आणि रमा-कांत एवढेच काय ते जागत बसलो.

अशोक म्हणाला, "अण्णा, नुसती हवा खाऊन आणि पाणी पिऊन प्राण वाचविणे शक्य नाही."

मी म्हटले, "शत्रूंच्या स्वाधीन होण्याखेरीज दुसरा उपाय नाही. आपण पळून आलो ही मोठी चूक केली असे आता मला वाटू लागले आहे."

रमाकांत म्हणाला, "आपण त्यांच्या स्वाधीन होण्यानेही भागणार नाही. आपल्या हातून त्यांना चांगला प्रसाद मिळाला आहे. तेंव्हा ते आपणाला चांगले वागवणार नाहीत."

"पण येथे राहिलो तर उपासमारीने मरण्याची पाळी येईल ना!"

यावर कोणीच काही बोलला नाही. रात्र किर्र करीत होती. इतक्यात समोरच्या वाळवंटातून 'बापरे, बापरे' असा आवाज आला. तो ऐकून आम्ही गप्प राहिलो. अशोक म्हणाला,

"कोणीतरी मनुष्य संकटात सापडला आहे असे वाटते."

रमाकांतने शंका काढली की, "हे वामनमूर्ती लोक एखाद्या मनुष्याचा जीव तर घेत नसतील ना?"

इतक्यात पुनः तोच रडण्याचा सूर आला. तेंव्हा अशोक पिस्तूल घेऊन गुहेबाहेर जाऊ लागला.

मी म्हटले, "जाऊ नको, थांब."

"का?"

"तुला एवढे कळत नाही? हा मनुष्याचा आवाज नाही."

"मग कशाचा आवाज हा?"

"उद्या सकाळी त्याचा तपास काढू." असे म्हणून मी त्याला परत फिरविले. तो लांब उसासा टाकून परत खाली बसला. बाहेर भयाण रात्र भेडसावीत होती. मी स्वस्थ बसून विचार करू लागलो. रात्री इतका भयंकर आर्त नाद कशाचा असावा? पृथ्वीवरल्यापेक्षा येथे सर्वच गोष्टी निराळ्या घडतात, तसलाच काही प्रकार असेल असे मी मनाने समाधान करून घेतले. नंतर मला हळुहळू झोप येऊ लागली आणि थोड्याच वेळात मी झोपी गेलो. त्यानंतर त्या रात्री तो आर्तनाद ऐकू आला नाही.

दुसरे दिवशी सकाळी आम्ही सर्व पहाडावर बोलत बसलो असता अशोक ओरडून म्हणाला, "ते पहा, ते पहा सर्वजण कोठे चालले आहेत?"

आम्ही सर्वांनी बारीक नजरेने पाहिले, तेव्हा पन्नासपन्नास बटू रांगेने चाललेले दिसले काहींच्या खांद्यावर बाके होती. कोणाच्या डोक्यावर हारा होता, कोणाच्या डोक्यावर मोठे थोरले गाठोडे, तर कोणाच्या डोक्यावर मोठे भांडे होते. कोणी खांद्यावर कावड घेतली होती. त्यातून नानाप्रकारची फळफळावळ भरलेली

दिसत होती. दूर शहरी बाजाराकरिता ही माणसे चालली असावीत असा आम्ही तर्क केला. आमच्या विषयीच्या गोष्टी त्यांच्या कानी गेल्या नसाव्यात. नाहीतर त्या रस्त्याने जाण्याचे धाडस त्यांनी केले नसते.



अशोकला मोठा आनंद झाला. तो सर्वांना उद्देशून म्हणाला, "चला गडयांनो, हे आयते वाढून आलेले ताट हातचे जाऊ देता कामा नये." इतके बोलून तो पहाडावरून उतरू लागला.

अशोकला पाहताच त्या वामन मूर्तींची गाळण उडाली. आयुष्यात त्यांनी यावेळीच पृथ्वीवरल्या माणसाचे तोंड प्रथम पाहिले होते. ते घाबरून सैरावैरा पळू लागले. अशोकच्या मागोमाग आम्हीही त्यांच्या नजरेस पडलो, तेव्हा तर ते मोठमोठ्याने ओरडून पळू लागले. त्याबरोबर अशोकने तीनताड उडी मारली.

आम्हीही मारली. हां हां म्हणता आम्ही त्यांच्याजवळचे सगळे खाद्यपदार्थ काढून घेतले. आम्हाला कोणीही मना केले नाही. ते बिचारे जीव घेऊन पळाले.

नंतर हरिहर हसत हसत अशोकला म्हणाला, "तू नास्तिक आहेस" देव मानीत नाहीस. पण पहा आज त्याने कसे नेमके आपल्याकडे अन्न रवाना केले!"

* *

# एकोणीस

खाणे झाल्यानंतर मी सर्वांना बोलावून म्हटले, "हे पहा, अशा रीतीने आपला निभाव फार दिवस लागणार नाही. आपण काय करावयाचे ते निश्चित ठरविले पाहिजे. आजचा दिवस कसाबसा भागला. परंतु उद्याची तरतूद काय करावयाची?"

रमाकांत म्हणाला, "बरोबर आहे; आपल्या भीतीने या पुढे हे लोक इकडे फिरकणार नाहीत."

"मी म्हणतो, आपण लपत छपत जवळच्या शहरात गेलो तर?"

"ते कशासाठी?"

"हे वामनमूर्ती आता काही स्वस्थ बसणार नाहीत. आपल्यावर सूड घेण्याचा त्यांचा उद्योग चालू असेल. त्यांचा काय

उद्योग चालला आहे, ते आगाऊ कळले तर त्या धोरणानें स्वसंरक्षणाची तजवीज आपणाला करता येईल."

"अशोक, तुझा विचार काही वाईट नाही. शहरांतून आपणाला काही खाद्यही आणता येईल. खरे की नाही ? अशोक हसून म्हणाला, "बरोबर आहे. हे बटू शिपाई आम्हाला काही भारी नाहीत. आमच्यापैकी प्रत्येकजण आठ शिपायांना मारू शकेल. शिवाय त्यांना आमच्यासारख्या उड्या कोठे मारायला येत आहेत! खरे, तसाच प्रसंग पडला तर लांब लांब उड्या मारून आपणाला पळून जाता येईल."

पुनः 'बाप रे, बाप रे' असा ओरडण्याचा शब्द कानी आला. आम्ही बाहेर येऊन नीट पाहिले. परंतु एकही मनुष्यप्राणी कोठे दिसेना.

हरिहर म्हणाला, "ही सगळी भूतचेष्टा दिसते." इतक्यात दुरून 'भो भो' असा कुत्र्याच्या ओरडण्यासारखा आवाज कानावर आला. हरिहर ओरडला, "पळा रे पळा! भूतांचेच ओरडणे हे!"

तो इतके बोलतो आहे तो पुनः 'बापरे' असा शब्द कानी आला. मी बाहेर येऊन पाहिलें. तो ते चतुष्पाद पक्षीच अशा तऱ्हेचा स्वर काढीत होतें असे दिसलें.

अभिराम म्हणाला, "पक्ष्यांचा स्वर मनुष्यासारखा! साराच चमत्कार!"

अजून कुत्र्याचा आवाज दुरून येत होता. मी निरखून पाहिले तो कालव्या जवळून एक काळाकुळकुळीत प्राणी वेगाने धावत येत होता. तो कुत्र्यासारखा दिसत होता. 'भो भो' हा आवाज त्याच प्राण्याचा असावा असे मला वाटले.

हरिहर म्हणाला, "अरे माझा बादशहा तर नसेल ?"

तो घाईघाईने उतरून जाऊ लागला. आम्हीही त्याच्या पाठोपाठ निघालो. हरिहरने मोठमोठ्याने "बादशहा! बादशहा! यू यू यू!" अशी हाक मारली. माणसाची चाहूल लागून दूर असलेला प्राणी दुसरीकडे पळत जात होता. पण हरिहरची हाक ऐकून तो थांबला. आणि मग खूप जोराने ओरडून तीरासारखा धावत येऊ लागला. क्षणार्धात तो जवळ येऊन ठेपला. हरिहरला पाहताच तो त्याचे तळपाय चाटू लागला व अंगावर सारखा उड्या मारू लागला. बादशहा भेटल्यामुळे हरिहरचा आनंद गगनात मावेना. त्याने त्याला उचलून पोटाशी धरले. बादशहाच्या गळ्यात सोन्याची अर्धीच साखळी होती. त्यावरून तो साखळी तोडून पळाला असावा असे दिसले. मी, अभिराम, अशोक, रमाकांत इ. आम्हा सर्वांच्याच अंगावर बादशहाने उड्या मारल्या. फार दिवसांनी आपले जिवलग मित्र भेटावे तसा त्याला आनंद झालेला दिसला.

बादशहाला भेटल्यामुळे आम्हाला देखील तसाच आनंद झाला होता. या नव्या जगात पृथ्वीवरील माणसेच काय पण कोणताही प्राणी दिसला तरी तो आम्हाला आपलासा वाटे आणि त्याच्या विषयी जिव्हाळा उत्पन्न होई. बादशहा कुत्रा म्हणून त्याला तुच्छ लेखण्याचे आमच्या मनातही आले नाही. विमानांत वटवृक्षावरील जी माकडे आम्हाला येथे एकदा दिसली होती, ती तेथे आमच्याकडे पळून आली असती तर त्यांनाही आम्ही आश्रय दिला असता. तेही पृथ्वीवरचेच प्राणी. त्यांचा आमचा तसाच ऋणानुबंध होता.

✻ ✻

म्हणाला, "आपणाला आता कोठारावर हल्ला करून अन्न मिळविले पाहिजे."

मी म्हटले, "नाही. आता आपण पृथ्वीवर जाऊ या."

अभिराम, रमाकांत आणि हरिहर यांनी एकदम ओरडून विचारले, "काय पृथ्वीवर जाणार?"

हरिहर तर स्तिमित होऊन वेड्यासारखा माझ्याकडे पाहू लागला. आश्चर्यातिशयामुळे त्याच्या तोंडून अक्षर फुटेना.

मी म्हटले, "हो पृथ्वीवर जाऊ. कारण पृथ्वीवर परत फिरावयाची हीच संधी साधली पाहिजे. पुनः अशी संधी मिळावयाची नाही. सध्या मंगळ आणि पृथ्वी जवळ जवळ आहेत. एकदा ती दूर झाली म्हणजे पृथ्वीवर जाणे अशक्य होईल."

अभिरामने एकदम विचारले, "पण जायचे कसे? आपणाला का पंख आहेत उडून जायला?"

मी उत्तर केले, "अरे, जसे आलो तसे जाऊ. याच विमानात बसून जाऊ."

यावर अशोक म्हणाला, "पण आमच्यापैकी कोणालाच विमान चालविता येत नाही हें तुम्हाला माहीत आहे ना?"

मी म्हटले, "ते मला ठाऊक आहे. हे विमान पाहूनच माझ्या डोक्यात हा विचार आला. आपण या वामनमूर्तींनाच विमान चालवायला आणि आपणाला पृथ्वीवर सोडायला लावू. मग तर झाले ना?"

अशोक आनंदून म्हणाला, "ठीक, ठीक. आता आले लक्षात. त्यांना जरब दाखवून आपल्या हुकूमाप्रमाणे काम करावयास लावायचे असेच की नाही?"

मी म्हटलें, "हो असेच. या ठिकाणच्या वामनमूर्तींची

शस्त्रास्त्रे आपण काढून घेतली आहेत. इतर शिपाई शहरात आहेत. हाच आपला शुभमुहूर्त. प्राणाच्या भीतीने हे वामनमूर्ती आपणाला पृथ्वीवर न्यायला कबूल होतील."

अशोक म्हणाला, "धन्य आहे अण्णांच्या बुद्धीची ! रमाकांत हात जोडून सद्‌गदित कंठाने म्हणाला, "असे केले तर आता आपणाला पृथ्वीवर परत जाता येईल." पृथ्वीवर परत जायला मिळणार म्हणून सर्वांनाच आनंद झालेला दिसला. अभिराम आणि हरिहर हे तर एकमेकांचे हात धरून नाचू लागले बादशहालाही स्फूर्ती आली. आणि तोही इकडे तिकडे उड्या मारू लागला. दुसरी मंडळी ही आपापल्या परीने आनंद व्यक्त करू लागली.

मी सर्वांना उद्देशून म्हटले, "हे पहा. इतक्यात हरळून जाऊ नका. समोर पहा इतके अंतर तोडून आपण पृथ्वीवर पोचतो की नाही याचीच वानवा आहे. मग त्याच्या आधी हे बटुमूर्ती विमान चालवायला कबूल होतील की नाही कोणास ठाऊक ? '

अशोक रागाने डोळे वटारून म्हणाला, "त्यांना विमान न चालवायला काय झाले? म्हणावे माझ्याशी गाठ आहे. एकेकाला चांगला ठोकून काढीन."

असे म्हणून पिस्तूल घेऊन तो वामनमूर्तीकडे जाऊ लागला. आम्हीही त्याच्या पाठोपाठ गेलो.

यातलेच काही वामनमूर्ती आम्ही पूर्वी पृथ्वीवरून येताना यंत्रघरात कामे करीत असलेले पाहिले होते. तेच त्यावेळी विमान चालवित होते. त्यांचा पोषाखही शिपायांच्या पोषाखाहून निराळा होता. त्या पोषाखावरून आम्ही ते लोक निवडून काढले. ते भितीने थरथर कापत होते.

अशोकने त्यांना विमानाच्या इंजिनाकडे चलण्याची खूण केली. त्याबरोबर ते मुकाट्याने त्याच्या पाठोपाठ जाऊ लागले. आमच्यापैकी बाकीच्या लोकांना पहाऱ्यावर बसवून मी इंजिनाच्या खोलीकडे गेलो. विमानाचा मुख्य दरवाजा आम्ही आधीच लावून घेतला होता.

अभिराम म्हणाला, "या विमानात इतके सोने भरले आहे आहे की, आपण पृथ्वीवर गेल्यावर खूप श्रीमंत होऊ."

मी हसून म्हणालो, "अगोदर प्राण बचावून पृथ्वीवर जाऊ या; मग श्रीमंत होण्याची बात बोला. येथे सोन्याला काय किंमत आहे? काहीच नाही!"

अशोकने बटू शिपायांना यंत्राकडे बोट दाखवून ते चालू करा असा खुणेने हुकूम केला. त्यांना खुणेचा अर्थ कळल्यावर त्यांची तोंडे सुकून गेली. आणि गोंधळून जाऊन ते एकमेकांच्या तोंडाकडे पाहात उभे राहिले.

अशोकने पुनः तीच खूण केली.


तरीही ते हालेनात!

मग मात्र अशोकने त्यांच्यावर पिस्तुलाचा नेम धरला. पिस्तूल पाहताच ते शुद्धीवर आले आणि भराभरा कामाला लागून यंत्राला चालना देऊ लागले. हा सारा पिस्तुलाचा प्रभाव! विमान हळुहळू वर जाऊ लागले. माझाही आनंद पोटात मावेनासा झाला. 'जय पृथ्वीमाता की जय' असा मी आनंदाने जयध्वनी केला. त्या वेळचा आनंद अवर्णनीय होता!

विमान अधिकाअधिक वर जाऊ लागले. आणखी वर, आणखी वर!

खाली पाहिले तो सर्वत्र दिव्यांच्या प्रकाशाचा लखलखाट

दिसत होता. आमच्या विमानाचा आवाज ऐकून सर्व लोक खड-बडून जागे झाले असावेत. बहुतेक शेकडो विमाने आम्हाला धरण्या-करिता आमच्या पाठोपाठ येतील असे आम्हाला वाटले.



अशोकने बटुमुर्तींना वारंवार धमकावून विमानाचा वेग वाढविण्यास सांगितले. त्यांनीही एखाद्या उल्केप्रमाणे आमचे विमान जोरात नेण्यास सुरुवात केली. पाहता पाहता शहरातील दिव्यांचा प्रकाश अदृश्य झाला. आता आम्ही बरेच दूर असल्या-कारणाने आम्हाला निश्चित वाटत होते. लहान विमाने येथवर येणे अशक्य होते.

शहराच्या अंधुक प्रकाशाकडे पाहून मी म्हटले, "हे मंगळा! तुला नमस्कार असो. तुझी रजा घेतो. तुझा वालुकामय प्रदेश, तुझे दोन चंद्र, आणि तुझी अपूर्व प्रजा या सर्वांचा आता आम्ही निरोप घेत आहोत. तुझ्या ठिकाणची अनेक रहस्ये आम्हास अजून कळली

नसतील. परंतु जी कळली तेवढ्यावरून मात्र असे वाटते की, जेवढी कळली तेवढी पुरेत. आता आणखी रहस्ये कळून घेण्याचीं इच्छा नाही. पृथ्वीमातेची हाक कानात गुणगुणत आहे. आता पुनः तुझ्यावर येणे नको.

"नमस्ते, मंगळा! नमस्ते."

* *

# बावीस

त्यानंतर काही विशेष घडले नाहीं. बटुमूर्तींवर आम्ही पाळी-पाळीने सारखा पहारा ठेविला होता. त्यामुळे ते आपले काम अगदी लक्षपूर्वक करीत होते. पृथ्वीवरील कोणत्या देशात आम्ही उतरू याचा नेम नव्हता. परंतु कोठेही उतरलो तरी तेथील लोकांना आमच्या सफरीचा इतिहास ऐकून आश्चर्य वाटेल. आणि आमच्याबद्दल पृथ्वीवर चर्चा सुरू होईल. वास्तविक आमची कथा इतकी अद्भूत होती की तीवर कोणीही विश्वास ठेवला नसता. परंतु विमान आणि त्यातींल बटुमूर्ती यांकडे लक्ष देऊन त्यांना विश्वास ठेवणें प्राप्त होते.

मंगळावरचे लोक पृथ्वीवरल्या वस्तू व प्राणी ह्यांचे नमुनें गोळा करून नेण्यासाठी आले होतें आम्हीही आज मंगळावरचे कित्येक नमुने घेऊन आलो होतो. नुसते नमुने घेऊनच नव्हे तर

मंगळावर विजय संपादून आलो होतो. आम्ही एवढे सिद्ध केले की, मंगळावरील लोक पृथ्वीवरील मनुष्यांपेक्षा जास्त सामर्थ्यवान् नाहीत.

पण हे काय संकट उद्‌भवले ! नदीचे अफाट पात्र ओलांडून आलेली नौका तीरापाशी फुटणार काय? आम्ही अगदी निश्चिंत-पणे पृथ्वीजवळ आलो आणि निश्चिंतपणे सर्वजण हसत खिदळत होतो. निर्भयतेचे पाणी सर्वांच्या डोळ्यात चमकत होते. इतक्यात भोवती चोहीकडे अंधार पडला, आणि वादळाची भैरवमूर्ती जागृत झाली. असे वादळ मी साऱ्या जन्मात कधी पाहिले नव्हते. आमचे एवढे प्रचंड विमान! पण ते एखाद्या शुष्क व जीर्ण पानाप्रमाणे त्या वादळात भिरभिर फिरू लागले. काही केल्या ते काबूत राहिना. प्रत्यक्ष काळ आमच्यापुढे साक्षात् उभा आहे असे आम्हाला क्षणो-क्षणी वाटले.

सुमारे चार तासपर्यंत आमच्या विमानाला इकडे तिकडे खेळविल्यानंतर वादळ एकदाचे थांबले. परंतु अंधार मात्र तसाच कायम होता. अशा अंधारात पृथ्वीवर उतरणे धोक्याचे होते.

सुदैवाने विमान हळुहळू खाली येत होते. नाहीतर एकदम खाली पडून आमचे राईराई एवढे तुकडेच झाले असते. आणि आमच्या सगळ्या आशांचा चुराडा झाला असता.

पण आम्ही कोठे उतरत आहोत. जमिनीवर की पाण्यात? हे अंधारात कळेना. कोठेही उतरलो तरी पृथ्वीवरच उतरणार या कल्पनेने आम्हाला आनंद झाला होता. धरणीमातेच्या अंकावर खेळण्याकरिता आम्ही फार उत्सुक झालो होतो.

इतक्यात एक धक्का बसून विमान थांबले. आम्ही एकदाचे पृथ्वीवर आलो.

आम्ही सर्वांनी एकसूराने जयध्वनी केला. तो ऐकून बटु-मूर्ती आमच्याकडे पाहातच राहिले. विमानाचा दरवाजा उघडून आम्ही बाहेर पाहिले. तो अंधाराची काळीकुट्ट काजळी चारी दिशांवर पसरलेली दिसली. जिकडे पाहावे तिकडे अंधार ! अंधार ! अंधार !

रात्र संपून प्रभात होईपर्यंत वाट पहाण्याचे आम्ही ठरविले. खिडकीतून गार वाऱ्याच्या झुळका अंगाला झोंबत होत्या. हा आमच्या भूमातेचा वारा आम्ही ओळखला. त्याची ओळख बुजणे शक्य नव्हते.

काही वेळाने दिशा उजळल्या. पूर्वेकडील आकाशात आशेची एक बारीकशी पांढरी रेष दिसू लागली. अजूनही रात्रीच्या अंधाराची काळी छाया होतीच. आणि तिने समोरचा सगळा प्रांत झाकून टाकिला होता. तरी पण ते आवरण पातळ होत चालले होते. अजून झाडाझुडुपांचा हिरवा रंग दिसू लागला नव्हता. अभिराम वगैरे मंडळींच्याने राहवेना. ती मंडळी खाली उतरली. त्यांच्या पाठोपाठ मी उतरलो. माझ्या पाठोपाठ बादशहा टुणदिशी उडी मारून खाली आला.

खाली आल्यानंतर बटुमूर्तींना आम्ही खूण केली आणि आता तुम्हाला परत जायला काही हरकत नाही, असे सांगितले. खरोखर आम्हाला त्यांचे आभार मानावयास पाहिजे होते. कारण आमच्या धरणीमातेच्या अंकावर पुन: सुरक्षित आणून ठेवले होते. त्यांनी पण आमचे बोलणे त्यांना कुठे उमगायला ? आम्ही कृतज्ञता मुद्रेनेच दर्शविली. त्यांनाही आनंद झाल्यासारखे दिसले. बरे, एकदाचे या राक्षसी माणसांच्या तावडीतून सुटलो असे त्यांना वाटले असावे ! त्यांनी विमान चालू केले. थोड्याच वेळात ते

अजस्त्र धूड वर जाऊ लागून अंतराळात दिसेनासे झाले.

ते नाहीसे होई तोपर्यंत मी त्याच्याकडे पाहत होतो. अखेर मी एक नि:श्वास सोडला आणि अशोक, रमाकांतला म्हटले, "चला, आपण आता मार्गाला लागू या."

● ● ●

[सदाशिवरावांची रोजनिशी येथेच संपली. आणि आमची ही अद्भूत कथाही आटोपली. सुदैवाने आपली ही मित्रमंडळी आपल्या गावांपासून तीनचारशे मैलावरच उतरली होती. त्यामुळे रेल्वेचा मार्ग शोधून आपल्या गावी येण्यास त्यांना फारसा अवधी लागला नाही. वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना मुलाखती देता देता सदाशिवराव रंजीस आले. पण लौकरच त्यांना शांतता मिळून ते आपल्या संशोधन, वाचन इ. कार्यात गढून गेले. मित्रमंडळीपैकी आता कोणीही असल्या धाडसात पुनः पडायला तयार नाहीत. अशोक मात्र अजून म्हणतो की, "बस्स, अशा गोष्टीत खरी मौज आहे. पुनः एखाद्या बुधावर किंवा शुक्रावर जायची संधी आली तर आपण नाही सोडणार बुवा!"

—लेखक]

म. ग्रं. सं. ...
९०८
किशोर
BVBK-0400107
BVBK-0400107